ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**जानेवारी २०१०**
**वर्ष ३० वे, अंक १ ला, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **धनंजय गांगल**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स. न.

ग्रंथालीचा गेला वाचकदिन सर्वार्थांनी वेगळा होता. या वर्षात ग्रंथालीला ३५ वर्षं आणि दिनकर गांगलांना ७० वर्षं पूर्ण झाली. ग्रंथालीच्या स्थापनेपासून म्हणजे गेली ३५ वर्षं गांगल ग्रंथालीत कार्यरत होते. त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस होता. पंचमदा म्हणायचा की आर. डी. बर्मन ही काही एक व्यक्ती नाही, ती एक टीम आहे, प्रतिभावान व्यक्तींची. गांगलांबद्दलही हेच म्हणता येईल. ग्रंथालीच्या स्थापनेपासून वेगवेगळ्या टप्प्यांत त्यांचे अनेक सहकारी होते. एका अर्थाने या सगळ्यांबद्दलही ही कृतज्ञता होती.

या दिवसाला दुसराही एक लहानसा आयाम होता. गेले वर्ष-दीड वर्ष गांगल आणि त्यांचे सहकारी आपली जबाबदारी पुढील पिढीकडे संक्रमित करत आहेत. एका अर्थाने २५/१२ ला ते पूर्ण झाले असे म्हणता येईल. म्हणजे ही सगळी मंडळी ग्रंथालीत असतीलच, पण संस्थेतील पदाची म्हणून एक जबाबदारी असते त्यातून मुक्त झालेली आहेत. त्यामुळे ग्रंथालीच्या पुढील वाटचालीबाबत कुतूहल, साशंकता आणि अपेक्षा अशा संमिश्र भावना आपल्या सगळ्यांच्या मनात असणे साहजिक आहे. ही सगळी आव्हाने, अपेक्षा एवढी एकमेकात गुंतली आहेत की Where to begin and where to end असा प्रश्न पडतो.

सत्तरचे दशक हे भारताच्या राजकारणातील एक अशांत दशक. महाराष्ट्रात तर राजकारणाच्या जोडीला समाजकारण आणि सांस्कृतिकारणही ढवळून निघत होते. प्रस्थापित विरुद्ध नवे हा संघर्ष वेगवेगळ्या अंगांनी प्रकट होत होता. युकांद्र, पँथर, स्त्रीमुक्ती, अंधश्रद्धा निर्मुलन, प्रायोगिक नाटक अशा चळवळीतून पुण्या-मुंबईत साडेतीन टक्क्यांत एकवटलेल्या सांस्कृतिक सत्तेला उर्वरित महाराष्ट्रातून आव्हाने मिळत होती. ह्या चळवळी आपले विचार मांडायला, शेअर करायला, संवाद साधायला व्यासपीठ शोधत होत्या. तो ग्रंथालीने दिला. किंबहुना, त्यावेळच्या परिस्थितीचा रेटाच असा जबरदस्त होता की त्यांनीच ग्रंथाली घडवली असे म्हटले तर वावगे ठरणर नाही. त्याचे दुसरेही एक By Product होते. या विविध विचार, जाणिवा आणि अनुभवांना व्यासपीठ देण्याच्या निमित्ताने मराठी भाषेचे साचलेपण दूर झाले. एक प्रकारे भाषा समृद्ध व्हायला आणि टिकायला मदत झाली.

९० नंतर ही परिस्थिती बदलली. जागतिकीकरण असेल, आर्थिक उदारीकरण असेल. ८० मधील जनता पार्टीचा किंवा नंतरचा व्ही. पी. सिंग प्रयोग फसल्यामुळे असेल, पण समाजकारणाने संपूर्णपणे राजकारणाशी फारकत घेतली. Industrial Age मधून आले Knowledge Age. चळवळी थंडावल्या. त्याची जागा Advocacy ने घेतली. समाजकारणीही आता काही एकत्र काम करण्यात राम नाही अशी समजूत करून महाराष्ट्रभर विखुरले. ते आपापल्या क्षेत्रात चांगले विधायक काम करत आहेत, पण त्यांच्यात म्हणावा तसा संवाद नाही. त्यांना ओवणारा एक असा धागा नाही. त्यामुळे समाजकारणाचा राजकारणावर, नोकरशाहीवर, माध्यमांवर आणि मुख्य म्हणजे तंत्रज्ञानावर जो

पान २ वर

वचक हवा तो जवळपास नाही. तो पुन्हा एकदा निर्माण करणे हे एक मोठे आव्हान ग्रंथालीसमोर आहे.

दुसरी अपेक्षा आहे- सध्याचा हॉट टॉपिक म्हणजे 'मराठी टिकवण्याचा.''शिव्याही द्या, पण मराठीतून' असे म्हणणाऱ्या ग्रंथालीकडून ही अपेक्षा असणे साहजिक आहे. थोडे खोलात गेले तर हा प्रश्न मुंबई, पुणे, नाशिक या राज ट्रँगलमध्ये विशेष आहे हे जाणवते. त्याला अजूनही एक धागा आहे. परदेशस्थ मराठी माणसाचा. त्याची मराठीच्या ऱ्हासाची भीती जास्त खोल आहे.

हिब्रूंचा धर्मग्रंथ बुक ऑफ जेनेसिस यामध्ये एक टॉवर ऑफ बॅबेलची कथा आहे. इसवी सनापूर्वी जेव्हा केव्हा हे घडले असेल तेव्हा तो जो मानवसमूह होता तो एकसंध होता एकच भाषा बोलायचा आणि गुण्यागोविंदाने राहायचा. स्वर्गातील देवापर्यंत पोचण्यासाठी एक टॉवर बांधावा असे सगळ्यांना वाटले. त्यांनी तशी सुरुवातही केली. पण माणूस आपल्याजवळ पोचतोय, आपल्याशी स्पर्धा करतोय म्हटल्यावर देवाला राग आला. त्याने एकसंघ मानवसमूहाचं खच्चीकरण करण्यासाठी त्याला जगभर विखरून टाकलं आणि मुख्य म्हणजे त्यांना वेगवेगळी भाषा दिली. (Confused their languages). हे सगळे कशासाठी? तर त्यांच्यात संवाद होऊ नये, त्यांनी एकत्र येऊन आपल्याला आव्हान देऊ नये म्हणून. या पुराणकथेतील गंमत सोडली तरी संवाद आणि पर्यायाने भाषेची ताकद ही कथा अधोरेखित करते. एखाद्या मानवसमूहाचा सगळा सांस्कृतिक ठेवा आणि इतिहास त्याच्या भाषेत एकवटलेला असतो.

पण ही भाषा जेव्हा सभोवतालचे जग समजून घेण्यात आणि पर्यायाने व्यक्त करण्यात अपुरी पडू लागते तेव्हा दुसऱ्या भाषांचा आधार घेणे अपरिहार्य होते. गेल्या दोन दशकांत जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानाची प्रगती ज्या वेगाने आपल्याला व्यापून राहिली आहे ते भान म्हणावे तेवढे मराठी भाषेत उमटलेले दिसत नाही. हे भान निर्माण करण्याचे मोठे आव्हान आहे.

परवा 'हरित वसईचा लढा' पुस्तकाच्या प्रकाशनानिमित्त गप्पा मारताना कुमार केतकर जुन्या आठवणी उजळताना सहज बोलून गेले की ''मी आणि गांगलनी विविध विषयांवर, वेगवेगळ्या लोकांशी छोट्या छोट्या किती मीटिंग्ज घेतल्या असतील त्याला गणतीच नाही.'' समाजात सतत संवाद असावा ही ग्रंथालीची मूलभूत ऊर्मी. पुस्तके हा त्याचा एक आविष्कार. माध्यमांगणिक आविष्कार वाढतील, पण संवादाची मूळ ऊर्मी कायम राहील.

**– संपादक**





## गांगल७० ग्रंथाली३५

वाचकदिनी प्रसिद्ध झालेला महत्त्वपूर्ण दस्तावेज...

दिनकर गांगल यांच्या सत्तरीनिमित्त त्यांच्या सामाजिक-
सांस्कृतिक कार्याविषयी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी
केलेले लेखन
आणि
दिनकर गांगल यांची प्रदीर्घ मुलाखत

सोबत, कुमार केतकर यांची प्रस्तावना व अरुण साधू यांची
सांगता...

मूल्य ३०० रुपये, सवलतीत १८० रुपये

# ज्ञानेश्वरीत सापडलेले गांगल

## रविन थत्ते

‘गांगल सत्तर-ग्रंथाली पस्तीस’ या पुस्तकात मी लेख पाठवावा अशी आग्रहाची विनंती असतानाही मला लेख पाठवता आला नाही याची फार मोठी चुटपूट लागून गेली होती. सप्टेंबर महिन्यात आयुष्यात पहिल्यांदाच मलेरियाने मला ग्रासले आणि त्या आजाराने माझी अनेक इंद्रिये निकामी केली. मरता मरताच वाचलो, पण त्यानंतर कित्येक दिवस सर्व अंगाला कंप सुटला आणि लिहिणे अशक्य झाले. त्याच काळात मेंदू जणू काही थिजला आणि काही विचार करत लिहीन असे वाटणेही बंद झाले. नंतर हळुहळू व्यवसाय सुरू केला आणि ‘ग्रंथाली’च्या वाचकदिन कार्यक्रमाला गेलो आणि मेंदू अचानक सुधारला. मला सुचू लागले. लिहिलेच पाहिजे आणि ते आता शक्य आहे अशी भावना स्फुरली. गांगल आणि ग्रंथालीमुळे जे अनेकांना शक्य झाले ते माझ्याबाबतीतही त्या कार्यक्रमाने घडले ही पावती लेखाच्या सुरुवातीलाच देतो. त्या कार्यक्रमाचा माहोलच तसा होता.

गांगल ह्यांच्याबद्दल लिहिताना प्रथम सुचला तो ज्ञानेश्वरांच्या पसायदानातला ‘ग्रंथोपजीविये’ हा शब्द. त्या शब्दावर बरीच अर्थगर्भ चर्चा झाली आहे. हा ग्रंथ कोठला इथपासून ज्ञानोपासक असा सर्वसमावेशक अर्थ त्या ओवीच्या संबंधाने चर्चिला गेला आहे. मी ज्ञानोपासक या अर्थाच्या बाजूचा आहे. ज्ञानेश्वरी लिहिताना गीता ही निमित्तमात्र होती असे माझे ठाम मत आहे. मुळात गीताच मुळी एक संकलित संपादन आहे. त्यावर ज्ञानेश्वरांनी जवळजवळ त्यांच्या काळापर्यंत अस्तित्वात असलेल्या ज्ञानविज्ञानाचा धांडोळा घेत एक सुंदर कमान उभारली आहे आणि ती उभारल्यावर निरूपण संपवताना ग्रंथांवर ज्यांचे जीवन आहे त्यांना दृष्ट आणि अदृष्ट गोष्टींवर विजय मिळो अशी प्रार्थना केली आहे. गांगल या ग्रंथोपजीवी माणसानेही ज्ञानयज्ञ केला. त्यात मी पूर्वी एक श्लेष काढून हा विज्ञानयज्ञ आहे अशी टिप्पणी केली होती, पण ते काहीही असले तरी माहिती, विज्ञान किंवा ज्ञान यामधल्या रेषा पुसत अशा प्रकारचा यज्ञ करणारा भारतातला दिनकर गांगल हा एक असामान्य पुरुष खराच. प्रकाशन, आशय, छपाई, अर्थव्यवस्था आणि वितरण सांभाळताना जरी अनेक माणसे आजुबाजूला असली तरी मूळ खांब गांगल स्वत:च होते हे विसरून चालणार नाही. ज्यांना ढोबळ अर्थाने आणि खरे तर घोडचूक करत ‘जडवादी’ म्हणतात (घोडचूक अशासाठी, की विश्वात सर्वत्र पसरलेल्या चैतन्यात कधीमधी थोडेसे जड पदार्थ उत्पन्न होतात व त्यातही चैतन्यच जरा जास्तच ठासून भरलेले असते.) त्यामध्ये गांगल मोडतात अशी माझी समजूत आहे. तेव्हा दृश्य आणि अदृश्य अशी विभागणी त्यांना मान्य नसेलही, परंतु ग्रंथालीच्या पस्तीस वर्षांत बाकीच्यांना जे दिसले नाही ते ह्यांना दिसले-भावले हे त्यांना स्वत:लाही नाकारता येणार नाही. ज्ञानेश्वरीच्या गीतेला सोडून ज्या पहिल्या पन्नास-साठ ओव्या आहेत त्यात उन्मेखुसूक्ष्मेक्षणु आणि विवेकवंतु विमलु शुंशदंडु सरलु अशा दोन रचना गणपतीविषयी केलेल्या आहेत. उन्मेषाचे सूक्ष्म अवलोकन आणि विवेकयुक्त सरळपणा हे दोन्ही गुण गांगलांमध्ये होते हे काळच सांगून गेला आहे आणि ह्या दोघांचा जे दिसत नाही त्यांच्याशीच संबंध आहे हे निश्चित. अशी विलक्षण माणसे कशी निर्माण होतात हे निसर्गातले एक गूढ आहे. अनेक वर्षे त्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना, तुमचे म्हणजे गांगलांच्या कार्याचे जेवढे कौतुक व्हायला पाहिजे तेवढे झालेले नाही असे मी म्हणत असे तेव्हा एकदा बेसावधपणे (!) हे सगळे अपौरुषेय असते असे गांगल म्हणाल्याचे मला स्पष्ट आठवते. तथाकथित जडवादी गांगल ह्या व्यक्तीवर झालेला हा संस्कारयुक्त परिणाम असावा. विलक्षण व्यक्तिमत्त्वांचे वर्णन करताना ज्ञानेश्वरांनी पूर्वजन्मीच्या योगभ्रष्टाचे काय होते हे पुढीलप्रमाणे सांगितले आहे. शेवटी त्यातून योगीच निर्माण होतो अशी कल्पना (अध्याय सहा)

मोहकी देहाकृति उमटे।  
आणि उन्मेखा पहाट फुटे।  
सूर्यापुढे प्रकटे।  
प्रकाशु जैसा ।।

महाराष्ट्र सारस्वताबद्दल मी अनपढच. परंतु ज्या घरात उदंड मुले झाली त्यातल्या दिनकराने महाराष्ट्र टाइम्सची पुरवणी नव्या उन्मेखाने सजवली असे आपल्याला इतिहास सांगतो. सूर्योदयापूर्वीचे तांबडे ते हेच.

गांगल शेवटपर्यंत ग्रंथोपजीवीच राहिले. ग्रंथालीच्या सुरुवातीच्या काळातले सहकारी व्यवहारदृष्ट्या पांगले. ही टीका नव्हे तर वस्तुस्थिती आहे. ‘जशी ज्याची मति तशी त्याची गति’ अशी ज्ञानेश्वरांची उक्ती आहे. त्यात मला घुसडू नका असे श्रीकृष्ण सांगतो. गांगलांची मती नुसतीच घट्ट नव्हती तर सर्वस्पर्शी होती. त्या स्पर्शाबद्दल

अनुराधाने (सौ. गांगल ह्यांनी) मागच्या रुचीत लिहिले आहे. हा सर्वस्पर्शी समाजवादी झोळीवाला गांगल नावाचा गृहस्थ अनुराधा होती म्हणूनच आपली कारकीर्द करू शकला. लग्न ठरले तेव्हाचा पगार आणि झाले तेव्हाचा पगार कालक्रमाने कमी झाला होता तेव्हा सासुरवाडीच्या कपाळावर आठ्या पडल्या होत्या असा किस्सा आहे. पण अनुराधाने एकदा पदर खोचल्यावर मागे पाहिलेच नाही.

पाहें पां अनुरागे भजे।
जे प्रियोत्तमे मानिजे।
ते पतिही हनु काइ न वानीजे।
पतिव्रता।

ह्या सहाव्या अध्यायातल्या ज्ञानेश्वरीच्या ओवीत इथे पतिव्रतेचाच मान मोठा आहे असा आशय आला आहे. तो खराच आहे. किंबहुना गांगल जोडप्या-विषयीच ज्ञानेश्वरांनी ही ओवी सांगितली असावी असा भास होतो.

संपादकाचे कार्य नुसतेच उन्मेष-निदानाचे नसते. हे उन्मेष ओळखल्यावर त्यांची वर्गवारी करावी लागते आणि कोठे काय बसेल किंवा उठून दिसेल यांचा अंदाज घ्यावा लागेल. वाङ्मयमूर्तीचा पोषाख नखशिखांत असतो आणि कोणत्या तरी एकाच टोकाला तो पोषाख कलंडत तर नाही ह्याची खबरदारी घ्यावी लागते. म्हणूनच संपादकांची भलावण करताना 'व्यासादिकांच्या मती' (म्हणजे संपादकांची समरसतेची वृत्ती) असा शब्दप्रयोग केल्यावर त्यांना कमरपट्ट्याचे रूपक योजले आहे. पोषाख अशा तऱ्हेने आवरला जातो आणि त्या कंबरपट्ट्याचे पल्लवही असतात. वाङ्मयातील विविधतेबद्दल आणि तिच्या बांधणीबद्दल ही ओवी आणि आणि त्यातून ज्ञानवृक्षाच्या बांधणीबद्दलही आशय व्यक्त होतो. गांगलांची संपादकीय कारकीर्द चौफेर ठरली. परंतु कोठल्या तरी बाजूला कलली असे कधी झाले नाही. उपेक्षितांची अंतरंगे व्यक्त करणारी अनेक पुस्तके त्यांनी प्रसिद्ध केली. परंतु ग्रंथाली एककल्ली झाली आहे असे कधी भासले नाही. समाजवादी धाटणीचे त्यांचे अंतरंग त्यांना काहीतरी बजावत असणार. परंतु त्यांचा समाजाबद्दलचा वेध सर्वसमावेशक होता. उपेक्षित हुंकाराबद्दलचे वाङ्मय प्रसिद्ध करताना त्यातील अभिनिवेशामुळे समाजाला तडे जाणार नाहीत याची कळत-नकळत त्यांनी काळजी घेतली. दरी तर होतीच आणि आहेही आणि असेलही, परंतु नागर भाषा नसलेले वाङ्मय प्रसिद्ध करताना

ना तरि नगरांतरी वसिने।
तरि नागरांची होइजे।
तैसे व्यासोक्ति तेजे।
ढवळले सकळ।

या न्यायाने त्या वाङ्मयाचा त्यांनी नगरीमध्ये नागरी सन्मान मिळवून देऊन समाजाला एकत्र बांधण्याला हातभार लावला. ही गांगल मति ज्ञानेश्वरांनी सांगितलेल्या कमरपट्ट्याचे काम करण्यात यशस्वी ठरली.

संपादकाचे आणि प्रकाशकाचे आयुष्य मोठे जिकिरीचे असते. ठाम मते असलेली, भावनिक, अग्रेसर आणि लेखणी तलवारीसारखी परजणारी मंडळी सतत कोंडाळे करून संपादकांना आणि प्रकाशकांना घेरतात. ग्रंथालीचा थोडा मुलुखावेगळा स्वभाव बघता ही परिस्थिती निर्माण होणे जास्तच स्वाभाविक होते. यात राग, मोह, मत्सर, द्वेषाच्या लहरी उठू शकतात आणि त्यातून उपरोध, वितंडवाद, मर्मभेदकता, पाल्हाळ, टर उडवणे, छळवाद, व्यंग काढणे, डौलीपणा, कुटिलता, आशाळभूतपणा, संशय आणि फसवणूक हे भाव निर्माण होतात. तेराव्या अध्यायातल्या ओवीमध्ये हे भाव दिले आहेत. गांगलांच्या स्वत:च्या लिखाणात किंवा त्यांनी संपादित केलेल्या लिखाणात हे भाव जवळजवळ कोठेच दिसत नाहीत. जेव्हा दिसले तेव्हा ते प्रांजळपणातून निर्माण तरी झाले होते किंवा असह्य वेदनांच्या आक्रोशातून अभावितपणे ओसंडले असे म्हणावे लागेल. या ओवीच्या उत्तरार्धांत असे भाव नसलेल्या माणसांच्या भालप्रदेशावर कधीही आठ्या नसतात असा उल्लेख आहे. तो दिनकर गांगल व्यक्तीला साजेसा आहे. फारच अंगाशी आले तर 'तुम्ही कमाल करता आहात' असे हसत हसत म्हणणे यापलिकडे प्रत्युत्तर कधी गेले नाही. प्रत्येकाच्या आयुष्यात चढ-उतार असतातच तसेच त्यांच्याही आयुष्यात झाले असणार. आर्थिक कुतरओढ होतीच, स्वभाव संकोची आणि आटोपशीर त्यामुळे थोरा-मोठ्यांच्यात ऊठबस असूनही ज्याला ऐहिक श्रम म्हणतात ते मिळण्याचा संभव कमीच होता. सामाजात आलेल्या अवनतीमुळेही त्यांना वैफल्य वाटले असणार, कारण संवेदन सूक्ष्म मनाचा तो एक भागच आहे. कुटुंबात अकाली मृत्यू घडला. त्याचे दु:ख काय असते हे मी समजू शकतो. कारण मीही त्या भयानक दिव्यातून गेलो आहे. संस्था चालवताना स्वार्थी, अप्पलपोटी माणसे भेटणे स्वाभाविक होते. त्यांच्या उदात्त ध्येयांवर असली माणसे आडून-पाडून हल्ले करत होती तेव्हाही गांगल ढळल्याचे ऐकिवात नाही.

तरि षढिपंते जेणें।
आणि भावे जेणे।
धरिजे तेवि साहाणे।
सर्वची जेय।

या ओवीप्रमाणे स्त्री ज्या प्रेमाने अलंकार अंगावर चढवते त्या वृत्तीने त्यांनी सगळे सहन तर केलेच, पण कितीतरी करून दाखवले.

मी आणि गांगल एकाच वयाचे, पण अगदीच निराळ्या वृत्तीचे. ते मला भेटले, माझे मित्र झाले आणि मधुनमधून त्यांच्याशी संवाद घडले हे एका अर्थाने माझे सुदैवो प्रारब्ध. असेच संवाद घडत राहोत अशी मनोमनी इच्छा आहे.

**- रविन थत्ते**

४६, शिरीष, १८७ वीर सावरकर मार्ग,
मुंबई - ४०० ०१६
दूरध्वनी : २४४६ २६ ९८

# कोणत्याही माध्यमातून समाज ज्ञानसमृध्द व्हावा हीच इच्छा! – दिनकर गांगल

**रमेश दिघे**

सत्तरीतल्या दिनकर गांगल यांचा सत्कार सोहळा हे या वर्षीच्या वाचकदिन (२५ डिसेंबर ०९) ह्न कृतज्ञतादिन कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण होते. ग्रंथालीच्या नवीन सहा पुस्तकांसह 'गांगल ७०, ग्रंथाली ३५' हा गांगल गौरवग्रंथही या वेळी प्रसिद्ध करण्यात आला. दादरमधील कीर्ती महाविद्यालयाच्या मोकळ्या मैदानावर ऐन थंडीच्या लाटेत सुमारे साडेसहाशे श्रोते सलग साडेतीन तास शांतपणाने बसून होते. यावरून हा कार्यक्रम किती रंगतदार झाला असेल याची कल्पना येते. ही सर्व दिनकर गांगल या व्यक्तीची मोहिनी होती. 'ग्रंथाली'च्या स्थापनेपासून गेल्या पस्तीस वर्षांत सुमारे साडेचारशे पुस्तकांचे संपादन करणाऱ्या गांगल यांनी हजारो माणसे जोडली. त्याप्रमाणे ग्रंथालीशी जोडले गेलेले अभय बंग, सुशीलकुमार शिंदे, एकनाथ ठाकूर या तीन टोकांच्या व्यक्ती ग्रंथालीच्या निमंत्रणाचा मान राखून आल्या होत्या.

पुस्तक प्रकाशनाच्या पहिल्या भागानंतर चहापानाचे मध्यंतर होईल असे वाटत असतानाच दिनकर व अनुराधा गांगल या उत्सवमूर्तींसह एकनाथ ठाकूर, सुशीलकुमार शिंदे, डॉ. अभय बंग व लक्ष्मण माने हे व्यासपीठावर स्थानापन्न झालेसुध्दा. 'गांगल ७०' ह्न गौरवग्रंथाचे संपादन करणारा सुदेश हिंगलासपूरकर बोलायला उभा राहिल्यावर सर्व सभा स्तब्ध झाली. आपल्या आयुष्यातील पन्नासपैकी पस्तीस वर्षे ग्रंथालीसाठी देणाऱ्या सुदेशचे प्रांजळ अनुभवनकथन पुस्तकात आहे. तेव्हा तो काय बोलणार याची उत्सुकता होतीच. खिशातून कागद बाहेर काढत सुदेश घडाघडा बोलू लागला, 'या पुस्तकात जे चांगलं आहे त्याचं श्रेय संपादक मंडळातील अरुण साधू, सुनील कर्णिक, सुरेश लोटलीकर यांचं असून उणिवांची जबाबदारी माझी आहे.' असे सांगून सुदेश म्हणला, 'गांगलांसारखी मोठी माणसं माझ्या आयुष्यात आली हे मी माझं भाग्य समजतो. ग्रंथालीच्या दैनंदिन कामकाजातून गांगल, साधू, केतकर इत्यादी ज्येष्ठ मंडळी निवृत्त झाली असली तरी आमची नवी पिढी त्यांचं मार्गदर्शन सतत घेत राहील. यापुढील काळातही व्यावसायिक प्रकाशन संस्थेच्या पध्दतीनं न जाता ग्रंथाली ही संस्थापकांनी आखून दिलेल्या मार्गानुसारच चळवळ म्हणून वाटचाल करील.' अशी ग्वाही देत असतानाच आगामी काळातील आव्हाने पेलण्यास नवी पिढी सक्षम असल्याचा आत्मविश्वास सुदेशने बोलून दाखवला.

या वेळी अरुण साधू यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कोणत्याही व्यक्ती, संस्थेत भावनिक पातळीवर गुंतून न राहता काठावर राहून वस्तुनिष्ठ विश्लेषण करणे हे साधू यांचे खास वैशिष्ट्य. त्याचाच प्रत्यय यांच्या भाषणात आला. साधू म्हणाले, ''गांगलांची व माझी सत्तेचाळीस वर्षांची जुनी मैत्री आहे. गांगल, मी व केतकर यांनी ही चळवळ उभी केली म्हणून मी कौतुक करतो असं नाही, तर जगातील कोणत्याही भाषेतील ग्रंथव्यवहारात अशी चळवळ नाही. ग्रंथालीच्या वाढलेल्या व्यापाचं श्रेय गांगल यांचं आहे. त्यांनी सर्व समाजाला बरोबर घेऊन एक सांस्कृतिक माहोल उभा केला. पण दुर्दैवानं अशा कार्याचं मूल्यमापन करण्याची पध्दती आपल्या समाजात नाही. ग्रंथालीच्या कार्याचा आढावा घेताना ती एक सांस्कृतिक चळवळ आहे याकडे निरीक्षकांचं दुर्लक्ष होतं. वाचन संस्कृतीचा प्रचार करून जनसामान्यांपर्यंत त्यांना परवडतील अशा किमतीत पुस्तकं उपलब्ध करून देणं हे ग्रंथालीचं उद्दिष्ट होतं. पुस्तक प्रकाशनातील व्यवसायाचा भाग वगळून ग्रंथालीच्या सांस्कृतिक आकांक्षा काय होत्या याचा टीकाकारांनी वस्तुनिष्ठ आढावा घ्यायला हवा. चळवळ व व्यवसाय यांत योग्य समतोल राखून निष्ठेनं, शिस्तीनं काम करणारा बेहिशोबी जुगारी लागतो. पस्तीस वर्षं गांगलांनी व्रताचारी तपस्व्यासारखी ही कठीण जबाबदारी सांभाळली म्हणून एक मोठं सांस्कृतिक कार्य उभं राहू शकलं. ग्रंथालीनं स्वत:च्या मालकीची जागा घेतली नाही. पण आधुनिक डिजिटल साधनांचा वापर करून ग्रंथाली कायम काळाच्या बरोबर राहिली आहे. तिच्या व्यवसायिक यशापेक्षा तिचं सांस्कृतिक संचित मोठं आहे!''

१९८६ च्या 'ग्रंथमोहोळ'पासून ग्रंथालीच्या कार्याला सर्व प्रकारचे सहकार्य करणाऱ्या एकनाथ ठाकूर यांच्या हस्ते गांगलांना गौरवनिधीचा एक लाख एक



**सत्कार समारंभाच्या सजावटीत व्यासपीठाच्या मागील बाजूस दिनकर गांगल यांचे हे उत्कृष्ट रेखाचित्र चितारले होते तरुण चित्रकार मिथिलेश नंदकुमार पाटील याने**

रुपयांचा धनादेश देण्यात आला. सारस्वत बँकेचे अध्यक्ष असलेले ठाकूर म्हणाले, ''माझ्या हस्ते गांगलांना धनादेश देण्यात संयोजकांची सूचकता दिसून येते. महाराष्ट्रात अनेक जुने अप्रकाशित ग्रंथ आहेत. ते प्रकाशित होणे गरजेचे आहे. यासाठी सारस्वत बँकेतर्फे नाममात्र एक टक्का दराने कर्ज देण्याची योजना असून सुरुवातीला पन्नास कोटी इतका निधी या योजनेसाठी उपलब्ध केला जाणार आहे. पुढील दहा वर्षांत हा निधी शंभर कोटींपर्यंत नेण्याचा आमचा विचार आहे.'' असे ठाकूर यांनी घोषित करताच टाळ्यांचा कडकडाट झाला. ते पुढे म्हणाले, ''दादरच्या ॲशलेनमधील शाळेत ग्रंथाली व आमच्या नॅशनल स्कूल ऑफ बँकिंगचे कार्यालय शेजारी शेजारी होते. त्या वेळी झालेल्या दीर्घ मुलाखती व गप्पांमधून गांगल अधिक कळत गेले. सर्व क्षेत्रातील मान्यवरांना गांगलांनी एकत्र गुंफले आहे आणि त्यांच्यापैकी अनेक जण आज इथे उपस्थित आहेत. यापेक्षा मोठी मानवी संपत्ती इतर सामाजिक संस्थांमध्ये पाहायला मिळणार नाही.''

ग्रंथालीच्या बेहिशोबी कारभाराचा तिचे टीकाकार नेहमीच उल्लेख करतात. 'उपरा'कार लक्ष्मण माने यांनी या कार्यक्रमात कौतुक केले ते ग्रंथालीच्या चोख व्यवहारांचे. माने म्हणाले, ''केवळ पुस्तकांच्या रॉयल्टीवर जगणारा गो.नी. दांडेकर यांच्यानंतर मी मराठीतला बहुधा पहिलाच लेखक असावा. 'उपरा'च्या प्रकाशनाच्या वेळेस मी गांगलांना एवढंच म्हणालो की मी एक सामाजिक कार्यकर्ता आहे. लेखनाशिवाय मला पोटापाण्याचा दुसरा उद्योग नाही. गेली तीस वर्षं ग्रंथालीच्या चेकवर माझा संसार चालतोय. मानधनाची आठवण करायला साधं चार ओळींचं पत्रही कधी टाकावं लागलं नाही. चळवळीचा फाटका संसार चालवत गांगलांनी मला नियमित पैसे पाठवलेत. एवढी शिस्त व्यावसायिक प्रकाशकसुद्धा पाळत नाहीत. माझ्या तरुण वयात मी कोल्हापुरात भाऊसाहेब खांडेकर यांच्याकडे कामाला होतो. अधुनमधून त्यांचे प्रकाशक खांडेकरांच्या घरी यायचे. शाल, श्रीफळ, पेढ्याचा पुडा देऊन भाऊसाहेबांचा सत्कार व्हायचा. पण मानधनाचं पाकीट काही कधी दिलं जायचं नाही. खांडेकरांची परिस्थिती ओढगस्तीची होती. याउलट, त्यांच्या भारंभार कादंबऱ्या विकून प्रकाशक गबर झाला होता. मात्र त्याच्या हातून पैसा सुटत नव्हता.''

गांगलांकडील आदरातिथ्याचा उल्लेख करत माने म्हणाले, ''मी मुंबईत दिवसभराची कामं उरकून शेवटी गांगलांकडे जायचो. मला गाडी पकडायची घाई असायची. त्याही गडबडीत अनुराधावहिनी मला गरम मुगाची खिचडी जेवायला घालायच्या. जे आतून येतं ते प्रेम वेगळंच असतं याचा प्रत्यय मला गांगलांकडे आला.''

'गांगल ७०, ग्रंथाली ३५' या ग्रंथाचे प्रकाशन करताना केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे म्हणाले, ''ग्रंथाली ही महाराष्ट्राची सांस्कृतिक ऊर्जा आहे. महाराष्ट्राच्या पन्नास वर्षांपैकी पस्तीस वर्षं ही ग्रंथालीच्या चळवळीनं व्यापलेली आहेत. याआधी महाराष्ट्रात वाचनाची चळवळ होती, पण ती एका मर्यादेपर्यंत. गांगलांनी खऱ्या अर्थानं ही चळवळ खेडोपाडी नेली. या पुस्तकासाठी कुमार केतकर यांनी अतिशय सुंदर प्रस्तावना लिहिली आहे. ती वाचताना मला चीनच्या क्रांतीची आठवण झाली. ग्रंथाली ही केवळ साहित्याची चळवळ नसून ती सामाजिक चळवळ आहे. मागे भगवान इंगळे यांच्या 'ढोर'चं प्रकाशन माझ्या हस्ते झालं. मी स्वत: याच समाजाचा आहे. दलितांमध्ये जातीची मोठी उतरंड आहे. तिथपर्यंत पोचण्यासाठी ग्रंथाली व गांगल यांच्याप्रमाणे पक्की कमिटमेंट उपयोगी पडू शकते.''

या कार्यक्रमात अरुणा साधू यांच्या हस्ते अनुराधा गांगल यांचा सत्कार करण्यात आला. तेव्हा अनुराधाबाई म्हणाल्या, ''हा सत्कार मी स्वीकारते. सत्कार करणाऱ्यांच्या भावनांची जाणीव ठेवून मी असं म्हणेन की मला काही देण्याऐवजी गांगलांच्या सत्कारासाठी हे पैसे वापरले असते तर

त्यासाठी ती माझी 'कॉन्ट्रिब्युशन'ही झाली असती. त्याचा मला जास्त आनंद झाला असता. या पुस्तकाविषयी म्हणायचं तर त्याचं नाव 'गांगल ३५, ग्रंथाली ७०' असं ठेवायला हवं होतं. आज या वयातही गांगल पस्तिशीच्या उत्साहानं काम करत आहेत. त्यांच्या कामात मला थोडाबहुत हातभार लावता आला हेच माझं भाग्य.''

गुरुजीबंधू यांनी तयार केलेले कलात्मक सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अभय बंग यांच्या हस्ते गांगल यांचा सत्कार करण्यात आला. त्या वेळी बंग म्हणाले, ''मी स्वत: गांधीवादी असलो तरी असं म्हणेन की गांधींना जे महाराष्ट्रात जमलं नाही ते दलित व ब्राह्मणांमधील दरी कमी करण्याचं क्रांतिकार्य ग्रंथालीच्या माध्यमातून गांगलांनी केलं आहे. ग्रंथालीनं प्रसिध्द केलेल्या दलित आत्मकथनांमुळे समाजातील खालच्या थराचं जीवन काय आहे, त्यांच्या वेदना काय आहेत हे उच्चभ्रू, सुशिक्षित समाजाला थोडं तरी समजलं. आम्ही तिकडे गडचिरोली, चंद्रपूर भागांत आदिवासी बालकांचं कुपोषण, पुरुषांचं दारूचं व्यसन यांच्या विरोधात संघर्ष करत असताना वर्तमानपत्रामधून वातावरण तापवण्याचं काम गांगल व त्यांच्या सहकारी पत्रकारमित्रांनी केलं. त्या वेळेस आमच्या मदतीस सरकार नव्हे तर ग्रंथाली परिवार धावून आला. गांगल स्वत: त्या भागात आले. कार्यकर्त्यांशी त्यांनी संवाद साधला. नावात 'ग' असूनही 'ग' ची बाधा न झालेला असा हा माणूस आहे.'' आजच्या परिस्थितीविषयी डॉ. बंग म्हणाले, ''१९९० नंतर समाजात चंगळवाद वाढत गेलाय. राज्याच्या एका टोकाला पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे. शेतकरी आत्महत्या करत आहेत. तर दुसरीकडे पाण्यासारखा पैसा मौजमजेवर खर्च होतोय. ९० पर्यंत पुस्तक हे प्रबोधनाचं साधन होतं. आता समाजात गोंधळाची परिस्थिती आहे. पुढचा मार्ग कोणता हे आता ग्रंथालीला नव्यानं शोधून काढावं लागेल.''

सत्कार समारंभादरम्यान प्रसिद्ध चित्रकार-कवी षांताराम पवार यांनी गांगलांसाठी खास डिझाइन केलेल सन्मानचिन्ह त्यांच्याच हस्ते गांगलांना प्रदान करण्यात आले.

सत्काराला उत्तर देताना दिनकर गांगल यांनी डॉ. बंग यांच्या नव्या मार्गाचा मुद्दा पुढे चालू ठेवला. ''गेल्या पस्तीस वर्षांतील ग्रंथालीच्या कार्यामधील ऊर्जा ही फक्त गांगल या एका व्यक्तीची नव्हती. शेखर साठे म्हणतो त्याप्रमाणे वातावरणात बाष्प होतंच. आम्ही त्याला थंडावा दिला इतकंच. त्या वेळी समाजप्रबोधनाचं, परिवर्तनाचं पुस्तक हे प्रभावी माध्यम होतं. आज विविध चॅनल, इंटरनेट असे ज्ञानप्राप्तीसाठी माध्यमांचे पर्याय उपलब्ध आहेत. कोणत्याही माध्यमातून समाज ज्ञानसमृध्द व्हावा एवढीच आमची इच्छा आहे.

''मी, अरुण, साधू, कुमार केतकर, अशोक जैन असे आम्ही पत्रकारितेतले असल्यानं भोवतालचं जग जाणून घेण्याची, समाज समजावून घेण्याची तीव्र इच्छा आमच्या मनात होती. आशा भोसले, कुमार गंधर्व, पु.ल.देशपांडे, अंतुले, शरद पवार अशा सर्व क्षेत्रांतील व्यक्तींना आम्ही ग्रंथालीच्या व्यासपीठावर आणलं आहे. समाजात मुक्त संवाद घडवून आणण्यावर आमचा भर होता. जात, पात, धर्म, समाजातील स्थान असा कोणताही भेद न मानता समाज एकत्र यावा असं वाटायचं. त्या वेळी समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या हातात पुस्तक असावं असं मनात येई. यातूनच ग्रंथालीचा जन्म झाला.'' १९८१ मध्ये पुण्यात ग्रंथप्रसार यात्रेची सांगता झाली, तेव्हा द.मा.मिरासदारांपासून बाबासाहेब पुरंदरे, गो.नी. दांडेकर, ना.धों. महानोर यांच्यापर्यंत सर्व नामवंत त्यात सहभागी झाले होते. त्या ऐतिहासिक क्षणांची आठवण देत गांगल शेवटी म्हणाले, ''आम्ही ग्रंथालीचे सर्व विश्वस्त आता निवृत्त झालो आहोत. कार्यकर्त्यांची नवी पिढी त्यांची जबाबदारी उत्तम पार पाडत आहे. कार्य पुढे नेणारे नवे कार्यकर्ते फार थोड्या स्वयंसेवी संस्थांना मिळतात. ग्रंथाली त्या बाबतीत भाग्यवान आहे!''

सत्कार सोहळ्याच्या आधी सहा नवीन पुस्तकांच्या प्रकाशन कार्यक्रमात 'नोबेल नगरीतील नवलस्वप्ने' या पुस्तकाचे एक लेखक सुधीर थत्ते यांनी अत्यंत थोडक्यात पण मार्मिक शब्दात, त्यांच्या खास वैज्ञानिक शैलीत गांगल यांच्या कार्याचा आढावा घेतला. थत्ते म्हणाले, ''उत्क्रांतिवादाची नव्यानं मांडणी करताना असं मांडलं जातंय की टप्प्याटप्प्यानं उत्क्रांती होत असताना मध्येच क्रांतिकारी बदल घडतात. एकदम उत्क्रांतीचा पुढचा टप्पा गाठला जातो. आपल्या मराठी संस्कृतीच्या संदर्भात बोलायचं झालं तर दिनकर गांगल यांचं कार्य असंच एखाद्या पर्वतासारखं मध्येच वर आलेलं दिसतं.''

आपल्या पुस्तकाच्या नावाचा आधार घेत थत्ते असे म्हणतात, की ''मराठीतला नोबेल पुरस्कार देण्याची कल्पना पुढे आलीच तर तो गांगल यांनाच द्यावा लागेल. आयुष्यात दोनदा नोबेल पुरस्कार मिळवण्याची कामगिरी फक्त एकदाच शक्य झाली आहे. त्याचप्रमाणे आणखी तीस वर्षांनंतर वयाचे शतक पूर्ण करताना गांगल हा पुरस्कार पुन्हा मिळवून विक्रमवीर ठरतील.'' थत्ते यांच्या बोलण्यातील तथ्य असे की, ग्रंथालीने 'बलुतं', 'उपरा' ही आत्मकथने प्रसिध्द केल्यावर मराठीत दलित आत्मकथनांची लाट उसळली. त्यातून अनेकांना अनुभवकथनाची प्रेरणा मिळाली.

वाचकदिनी प्रसिध्द झालेल्या 'उदई'चे लेखक प्रकाश चव्हाण यांचे मनोगत असेच होते. ते म्हणाले, ''आमचा बाप आन् आम्ही' या नरेंद्र जाधव यांच्या आत्मकथनाने मला पार झपाटून टाकले. यातूनच मला माझे अनुभव मांडण्याची स्फूर्ती मिळाली. 'उदई' म्हणजे वाळवी. 'चोरी करणाऱ्यांची जमात'

असा शिक्का बसल्याने गावात कोणाकडेही चोरी झाल्यावर पोलीस प्रथम पारध्यांच्या पोरांना उचलतात. तुरुंगात जाण्यामुळे तरुणांचे जीवन वाळवीप्रमाणे पोखरले जाणे या वेदनेचे चित्रण 'उदई'मध्ये करायला जमले ते ग्रंथालीमुळेच.''

ग्रंथालीने प्रसिध्द केलेल्या 'ढोर' या आत्मकथनामुळे भगवान इंगळे यांचे नाव चर्चेत आले. त्यांच्या व्यक्तिचित्रांचा संग्रह 'भिडू' वाचकदिनी प्रसिध्द झाला. इंगळे यांनी त्यांच्या मनोगतात सांगितले ह्न ''जो अंत:करणाला भिडतो, तो भिडू. आयुष्याच्या विविध टप्प्यांवर मला जे मित्र भेटले, त्यांच्या जीवनातील भयाण वास्तवामुळे मी अस्वस्थ झालो. अशा भिडूंची ही जीवनकहाणी! काही भिडू प्रतिकूल परिस्थितीशी निकरानं झुंजून मार्ग काढत असले तरी त्यांच्या अंतर्मनातदेखील खोल व्यथावेदना आहेत. त्यांच्या भल्याबुऱ्या अवस्थेला जबाबदार असणाऱ्या व्यवस्थेचा शोध घेण्याचा हा प्रांजळ प्रयत्न.'' बोलताना भगवान इंगळे यांनी त्यांच्या व्यक्तिचित्रांची थोडक्यात झलक सादर केली. 'सुकडी बहात्तरीन' या गाजलेल्या व्यक्तिचित्राबद्दल ते म्हणाले, 'दुष्काळी, खडीकेंद्रावरचं काम करताना एका मजुराला मुलगी झाली. त्यानं तिचं नाव 'सुकडी' ठेवलं. पुढे या जन्मदात्याची सांपत्तिक स्थिती सुधारली. शरीराच्या सुजेप्रमाणे सुधारलेल्या सांपत्तिक स्थितीनं त्या लेकीला अभागी जिणं जगायला भाग पाडलं' इंगळे यांचे हे वाक्य काळजाला 'भिडू'न गेले!

या कार्यक्रमात प्रकाशित झालेल्या कवितासंग्रहांचे विषयही थेट भिडणारे होते. आजच्या स्त्रीच्या दु:खाची दुखरी नस नेमकेपणाने पकडणाऱ्या अंजली कुलकर्णी यांचा 'बदलत गेलेली सही' हा संग्रह तसाच. सही म्हणजे व्यक्तीची स्वत:ची ओळख. 'बदलत गेलेली सही' हा कवितासंग्रह म्हणजे माणसांच्या, हरवत चाललेल्या स्वओळखीच्या शोधाचा प्रवास. अंजली कुलकर्णी यांनी वाचून दाखवलेल्या 'इगोचा व्हायरस' या कवितेतील काही ओळी अशा होत्या ह्न

*हा इगोचा व्हायरस कधी शिरला आपल्या नात्यात*

*सगळंच नेटवर्किंग झालं खराब त्याच्या नादात*

*विचित्र-विचित्र होत गेली प्रोग्रॅममधील गुंतागुंत*

*मधल्यामधे आपण झालो हॅंगह्न हॅंड टिल डेथ.....*

'उरल्यासुरल्या जगण्याचं रिमिक्स' हा गोविंद काजरेकर यांचा कवितासंग्रह प्रकाशित होत असताना त्यांनी सुध्दा दोन कविता वाचून दाखवल्या. यातील 'युगे अठ्ठावीस आता कोकलत बसा' या कवितेला ग्रंथालीच्या पठडीतील जाणकार श्रोत्यांनी विशेष दाद दिली.

*'वर्षानुवर्षे कुटले भजनात टाळ, मृदंग बडवले वाजवल्या झांजा*

*बाजापेटीचे भाते मारले पोटऱ्या दुखेस्तोवर, रात्र रात्र केली जाग्रणे'*

अशी सुरुवात करून विठ्ठलाच्या दर्शनाला जाणाऱ्या भक्ताची 'अवस्था' प्रत्यक्षात काय होते याचे वर्णन काजरेकर यांनी केले आहे. ते म्हणतात,

*'म्हणून गाठले पंढरपूर स्लॅक सिझन पाहून एस्टीनं मजल दरमजल करीत.*

*तरी बडव्याने मागितले एकशे एक सकाळच्या पारी थेट भेटीसाठी'*

शेवटच्या ओळीत उपरोधानं कवी म्हणतो –

*'येताना गळ्यात घातली तुळशीची माळ कोल्हापुरात ओरपला*

*तांबडा पांढरा रस्सा विठ्ठल रखुमाईला म्हणालो आता कोकलत बसा.'*

या ओळींवर टाळ्यांचा 'गजर' होत असताना 'या शतकाचा सात-बाराच होईल कोरा...' या बहात्तर पानी प्रदीर्घ कवितेचे प्रकाशन झाले. ही कविता लिहिणाऱ्या शंकरराव दिघे यांचे नंतर अरुण साधूंनीही त्यांच्या भाषणात कौतुक केले. ''आजही प्रदीर्घ कविता लिहणारे या ताकदीचे कवी मराठीत आहेत.'' असे म्हणत साधू यांनी असे नमूद केले की ''या सर्व चित्रणातून एक मर्मभेदी प्रहसन उभे राहू शकते. ग्रामीण संस्कृतीत घोळलेली आधुनिक मराठी कविता, किती मर्मभेदी असू शकते त्याचे हे जळजळीत उदाहरण.''

शंकरराव दिघे यांनी वाचून दाखवलेल्या काही ओळी अशा ह्न

**यंदाचा राज्य पुरस्कार प्राप्त केलेले 'आधुनिक अर्थशास्त्राचे निर्माते' या पुस्तकाचे लेखक यशवंत पंडितराव यांचा अच्युत गोडबोले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**





**यंदाचा राज्य पुरस्कार प्राप्त केलेले 'मैत्र जीवाचे' या पुस्तकाचे लेखक विदुर महाजन यांचा अच्युत गोडबोले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

*दादांच्या उघडा पाठशाळा*
*नवइंद्राचे घडवा सत्संग*
*रु-द्राक्षाच्या हातूनच आता*
*कर्मकांडाच्या कुरघोड्या उडवा*
*बापूंच्या लीलांसाठी*
*आश्रमाचे ऐश्वर्य जपण्या*
*दातृत्वाच्या कनाती लावत*

मालेगाव बॉम्बस्फोटातील धर्मार्धांचा सहभाग सूचीत करताना दिघे म्हणतात ह्व

*कपाळावर भगवे पट्टे बांधा .....*
*अन् वंदेमातरमचा घोशा लावत*
*आईच्याच पदराला*
*आरडीएक्सचे पलिते बांधा*

या तिन्ही कवितासंग्रहांचे प्रकाशन ग्रंथालीच्या प्रथमपासूनच्या कार्यकारिणी सदस्या ह्व कार्यकर्त्या व मराठी नवकवितेच्या अभ्यासक, कवयित्री उषा मेहता यांच्या हस्ते झाले. उषा मेहता म्हणाल्या ह्व ''आजच्या कवींच्या संवेदना तल्लख असून त्यांच्या कवितांमधून आजच्या शतकाचे प्रतिबिंब उमटताना दिसते. आधुनिक मराठी कवितेचा चेहरा वेगळेपणाचे भान देणारा आहे.''

कीर्ती कॉलेज दरवर्षी त्यांचे मैदान वाचकदिनासाठी खुलेपणाने देत असते. कवितासंग्रह वगळता बाकीच्या अन्य पुस्तकांचे प्रकाशन कीर्ती महाविद्यालयाचे प्राचार्य केंकरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी अगदी थोडक्यात आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, ''अत्यंत निर्भीडपणाने ज्ञानाचा प्रसार करणारी ग्रंथाली ही संस्था आहे. महाराष्ट्रातील गावागावात, घराघरांत स्वस्त किमतीत पुस्तके पोचवण्याचा ग्रंथालीचा प्रयत्न असतो. या उपक्रमास प्रोत्साहन देण्याचा आमचा प्रयत्न असतो.''

गांगलांच्या भाषणानंतर, या आल्हाददायी वातावरणाला पूरक अशा सतारीच्या स्वरांनी समारोहाची सांगता झाली. विदुर महाजन यांनी पाचच मिनिटे सादर केलेली सतार मनमोहक होती. जेवणाच्या ताटांचा कलकलाट झाला तेव्हा श्रोत्यांना वेळेचे भान आले. खरे तर, या सुग्रास जेवणापूर्वीच सर्व तृप्त झाले होते. कार्यक्रमाच्या नेटक्या संयोजनाबद्दल सुदेश व त्याच्या सहकाऱ्यांना शतश: धन्यवाद देत पुस्तकांच्या जड पिशवीने व जड अंत:करणाने प्रत्येक जण घराच्या दिशेने परतू लागला.

**ह्व रमेश दिघे**
९४२३०४७४४०


यंदाचा राज्य पुरस्कार प्राप्त झालेले पुस्तक



**आधुनिक अर्थशास्त्राचे निर्माते**
यशवंत पंडितराव

अर्थशास्त्राची निर्मिती ही गेल्या तीन-चारशे वर्षांतील घटना. एवढ्या अवधीत हा अभ्यास विकसित होत गेला, त्यात सिद्धांत मांडले गेले व खोडले गेले. देशोदेशीच्या अनेक विद्वानांची ही कामगिरी होती, परंतु त्यामध्येही सात महत्त्वपूर्ण आहेत. त्यांच्या विचारधारांच्या आधारे केलेली ही अर्थशास्त्राची मांडणी गोंधळलेल्या आर्थिक वातावरणात मार्गदर्शन ठरेल...

**मूल्य १०० रुपये**
**सवलतीत ६० रु.**

## २५ डिसेंबर - वाचकदिनी प्रसिद्ध झालेली पुस्तके



### बदलत गेलेली सही
अंजली कुलकर्णी

सही म्हणजे स्वओळख. 'बदलत गेलेली सही' हा कवितासंग्रह म्हणजे माणसांच्या, हरवत चाललेल्या स्वओळखीच्या शोधाचा प्रवास...

**मूल्य १२० रुपये; सवलतीत ७५ रुपये**

---



### या शतकाचा सात-बाराच होईल कोरा...
शंकरराव दिघे

या दीर्घ कवितेचा महानायक आहे ते विस्कटून चाललेले प्रातिनिधीक खेडे. तेथील उद्‌ध्वस्त होत असलेली माणसे, समतोल साधणाऱ्या पण लयाला चाललेल्या व्यवस्था आणि भरकटत चाललेली मूल्यसंचिते. लेखणीच्या फटकाऱ्यातून उभी राहतात या साऱ्याची अर्कचित्रे...

**मूल्य ८० रुपये; सवलतीत ५० रुपये**

---



### उरल्यासुरल्या जगण्याचं रिमिक्स
गोविंद काजरेकर

भोवतालच्या विनाशक दमनव्यवस्थांमुळे वर्तमान समाजात निर्माण झालेले अराजक, विसंगती आणि त्यातील हास्यास्पदता उघड करणारी कविता.

**मूल्य ७५ रुपये; सवलतीत ४५ रुपये**

## उदई

प्रकाश चव्हाण

अशिक्षण, दारूचं व्यसन, चोऱ्यामाऱ्या अशा वाईट मार्गाची उदई म्हणजे वाळवी लागलेल्या समाजातील एक बाप आपल्या मुलाला सारे कष्ट झेलून शिकवतो. मुलाला शिक्षणाचा असलेला तिटकारा आणि बापाचा ध्यास यांची ही संघर्षकहाणी. त्याबरोबर उलगडते पारधी समाजाचे दाहक वास्तव.

**मूल्य १६० रुपये; सवलतीत १०० रुपये**



---

## भिडू

भगवान इंगळे

जो अंत:करणाला भिडतो, तो भिडू. आयुष्याच्या विविध टप्प्यांवर लेखकाला जे मित्र भेटले, त्यांच्या जीवनातील भयाण वास्तवामुळे ते अस्वस्थ झाले. अशा भिडूंची ही जीवनकहाणी! ते म्हणतात, काही भिडू प्रतिकूल परिस्थितीशी निकरानं झुंजून मार्ग काढत असले तरी त्यांच्या अंतर्मनातदेखील खोल व्यथावेदना आहेत. त्यांच्या भल्याबुऱ्या अवस्थेला जबाबदार असणाऱ्या व्यवस्थेचा शोध घेण्याचा हा प्रांजळ प्रयत्न.

**मूल्य २५० रुपये; सवलतीत १५० रुपये**




---

## नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २००९

सुधीर थत्ते/नंदिनी थत्ते

२००९ साली जाहीर झालेल्या रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र आणि शरीरविज्ञान या विषयांनी नोबेल पारितोषिक विजेत्यांनी लावलेल्या शोधांची कथारूप मांडणी. सोबत त्यांचा परिचय.

१९९६ पासून सातत्याने चाललेला उपक्रम. तीन वर्षे राज्य पुरस्कार. खुद्द नोबेल विजेत्यांनी केलेला गौरव.

**मूल्य ८० रुपये; सवलतीत ५० रुपये**



# गांगल आणि ग्रंथाली दोघंही पस्तिशीत!

## सुनील कर्णिक

'वयाच्या पस्तिसाव्या वर्षी मी इंग्लंडला गेलो. दुसऱ्याला मान देण्याची तिथली वृत्ती पाहून मी इतका बदललो की तिथं माझा खऱ्या अर्थानं जन्म झाला असं मला वाटतं. त्याच्या आधीचं माझं आयुष्य अंधःकारमय होतं. पण तिथून पुढचं सर्व आयुष्य मी अत्यंत जिवंतपणे जगलो', असे दिनकर गांगलांचे उद्‌गार आपल्याला 'गांगल ७०, ग्रंथाली ३५' या त्यांच्या गौरवग्रंथात (ग्रंथाली प्रकाशन, सपांदक : सुदेश हिंगलासपूरकर) वाचायला मिळतात. याचा एक अर्थ असा, की गांगल आणि ग्रंथाली दोघंही आज पस्तिशीत आहेत. ती एकमेकांची जुळी भावंडंच आहेत म्हणा ना!

गांगलांची या ग्रंथातली ७५ पानांची प्रदीर्घ मुलाखत सारंग दर्शने यांनी घेतली आहे; ती अत्यंत वाचनीय आहे. गांगलांच्या रोह्यातील उगमापासून ग्रंथालीचे विविध उपक्रम आणि 'थिंक महाराष्ट्र-लिंक महाराष्ट्र' हा त्यांचा भावी प्रकल्प- या सगळ्याची सविस्तर चर्चा गांगलांच्या मुखातून आपल्याला उमजते. 'मला पॉझिटिव्ह एनर्जी अतिशय महत्त्वाची वाटते,' असं ते सांगतात. 'संघाचे लोक मंदबुद्धी असतात,' अशी स्पष्टोक्ती करतात. आणि 'पुस्तक ही काही जगातली पवित्र गोष्ट नव्हे' असेही उद्‌गार काढतात. 'आगरकरांपेक्षा टिळकांचं कार्य अधिक मोलाचं होतं', असं म्हणतात. व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनातले परिचित आणि अपरिचित गांगल आपल्याला या मुलाखतीतून अंगोपांगांनी समजतात.

याखेरीज, कुमार केतकर यांची सविस्तर प्रस्तावना ग्रंथाच्या आरंभी आहे, तर अरुण साधूंनी केलेली 'सांगता' अखेरीस आली आहे. गांगल, केतकर आणि साधू हे तिघंही ग्रंथालीचे बिनीचे शिलेदार आहेत. तेव्हा तिच्याविषयी या ग्रंथातील ही तिन्ही




अंगं किती लक्षवेधक असतील हे वेगळं सांगायला नको. केतकरांनी ग्रंथालीच्या सर्व हकिगतीला आपल्या भाष्याचं आगळं परिमाण दिलं आहे. गांगल आपल्या 'संस्कृति-कारणा'च्या मुद्याला वारंवार प्राधान्य देतात; त्याला उद्देशून केतकरांनी असं म्हटलं आहे, की समाजावर चांगले सांस्कृतिक संस्कार झाले तर त्यामुळे समाजाचं व्यापक हित साधलं जातं हा गांगलांचा मुद्दा खराच आहे; पण या बाबतीत पं. नेहरूंनी जी विशाल दृष्टी दिली आहे ती सर्वांनी स्वीकारणं अधिक उचित ठरेल. साधूंच्या सविस्तर लेखातही त्यांच्या खास शैलीतले अनेक मुद्दे आले आहेत.

उदाहरणार्थ, ग्रंथालीचा आर्थिक व्यवहार कायम आतबट्ट्याचा होता, तरीही गेली पस्तीस वर्षं ग्रंथाली सतत वाढत कशी राहिली? तर ग्रंथालीच्या मदतीसाठी तिचे कार्यकर्ते झोळी घेऊन फिरले; एवढचं नव्हे, आपली खिसापाकिटं त्यांनी ग्रंथालीसाठी अनेकदा रिती केली. ही चालकांची समर्पणवृत्ती ग्रंथालीत दिसते तशी इतर कुठल्याही प्रकाशनसंस्थेत दिसणार नाही, असं साधूंनी आवर्जून नमूद केलं आहे. केतकर आणि साधू यांचे हे दोन्ही लेख अत्यंत वाचनीय झाले आहेत.

या ग्रंथामधला सर्वात मोठा विभाग आहे तो ग्रंथालीच्या वर्तुळातील लहानमोठ्या ३२ असामींच्या अनुभव-कथनाचा. यात के. ज. पुरोहितांसारखे माजी संमेलनाध्यक्ष आहेत, चिं. स. लाटकरांसारखे मुद्रक आहेत, अ. पां. देशपांड्यांसारखे विज्ञान परिषदेचे चालक आहेत, षांताराम पवारांसारखे चित्रकार आहेत, ज्योती म्हापसेकरांसारखी नाटककार आहे, सुधीर नांदगावकरां-सारखे चित्रपट चळवळीचे अध्वर्यू आहेत, रमेश दिघेसारखा गांगलांचा माजी सहकारी आहे... या सर्वांनी अनेक सुरम्य आठवणींना उजाळा दिला आहे आणि तो अतिशय रसाळ झाला आहे. पण या विभागातला सर्वात शेवटचा आणि सर्वात वाचनीय लेख गांगलांच्या तालमीत तयार झालेला, अजातशत्रू कार्यकर्ता सुदेश हिंगलासपूरकर याचा आहे. त्याच्या लेखातील एक उतारा

आहे;

'सुदेश गांगल! हे नामांतर तुम्हाला कसं वाटतं? नुकतंच पुण्याच्या एका कॉलेजनं मला या नावानं पत्र पाठवलं. असा घोटाळा अनेक जण करतात. काही जण माझं हिंगलासपूरकर हे आगगाडीच्या डब्यासारखं लांब नाव उच्चारण्याचा आळस करतात, तर इतरांना वाटतं की मला काही आडनावच नाही; फक्त सुदेश एवढंच नाव आहे...!'

स्वत: सुदेश या गौरवग्रंथाचा संपादक आहे, प्रकाशक आहे आणि २५ डिसेंबरच्या त्यांच्या सत्काराचा संयोजकही आहे. म्हणजे तिकडे केतकर गांगलांना नेहरू-सदरा चढवण्याच्या खटपटीत असले, तरी इकडे सुदेश गांगलांचा शर्ट घालून सज्ज आहे, असाच याचा अर्थ आहे!

गंमत म्हणजे, या पुस्तकाची कल्पना सुचल्यापासून तीन महिन्यांच्या आत ते प्रसिद्धही झालं आहे! त्याच्या निर्मितीत मी सहभागी होतो. ही सर्व उलाढाल इतक्या हौसेनं आणि इतक्या गडबड-गोंधळात पार पडली की जणू त्यामध्ये अनेक वर्षं मोडली असावीत असा भास मला होतोय.

ग्रंथालीच्या दादर कचेरीवर अधूनमधून आमच्या साप्ताहिक बैठका होत. पण सर्वजण वेगवेगळ्या व्यापांत गुंतलेले असल्यानं त्या वारंवार पुढे ढकलल्या जात. आमचे निर्णय ग्रंथालीच्या कार्यकारिणीकडून संमत केले जात. खुद्द गांगलांचंही मत विचारात घेतलं जाई.

पण या विलक्षण गोंधळातून आम्हाला सावरणाऱ्या अनेक लहान-मोठ्या व्यक्ती ग्रंथालीच्या परिवारात होत्या. त्यापैकी दोन ठसठशीत नावं म्हणजे अरुण साधू आणि सुदेश हिंगलासपूरकर. साधूंच्या सुकोमल स्वभावाचा आणि त्यांच्या मराठीवरील प्रभुत्वाचा यावेळी मी जो अनुभव घेतला तो केवळ अविस्मरणीय आहे. या ग्रंथामध्ये त्यांचं स्वतःचं छायाचित्र समाविष्ट करण्यास त्यांनी मला वारंवार मनाई केली. तेव्हा 'ऑब्जेक्शन ओव्हररुल्ड!' असं उद्धट उत्तर देऊन मी ते ग्रंथात घुसवलंच.

तीच गोष्ट सुदेशची. त्याला शांत डोक्यानं आम्हाला सर्वांना सहन करावं लागे. पैशांची जुळवाजुळव करावी लागे. इतर सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागत. पाहुण्यांची ये-जा बघावी लागे. वेळ सांभाळावी लागे. ग्रंथालीच्या इतर व्यापाकडे लक्ष ठेवावं लागे. माझ्यासारख्याचे शिष्ट-अशिष्ट शेरे वेळी-अवेळी ऐकून घ्यावे लागत. शिवाय, त्याच्या व्यक्तिगत जीवनाच्या जबाबदाऱ्याही त्याच्यावर होत्याच. पण त्याचा उमदा, हसरा, उबदार स्वभाव कधी कोमेजला नाही. जणू आम्हा सर्वांचं काहीच ओझं त्याच्या शिरावर नाही, तो मोकळा, हलका आणि अतिशय सुखात आहे, अशा भावानं आम्हाला साथ देत राहिला.

- smkarnik06@hotmail.com





यंदाचा राज्य पुरस्कार मिळालेले पुस्तक

**मैत्र जीवाचे**

**विदुर महाजन**

विदुर महाजन यांचा तरुण मुलगा, मैत्रेय मोटारसायकलच्या अपघातात आकस्मिक हे जग सोडून गेला. तो आघात पचवणं महाजन कुटुंबास अशक्यप्राय झालं. त्यातून सावरण्यासाठी विदुर महाजन डायरी लिहू लागले. मग सुरू झाला एक शोध- जीवनमृत्यूचा, सुखदुःखांचा, मानवी अस्तित्वाचा व नात्यांचा आणि कलेचाही. तेच हे तत्त्वचिंतनपर ललितलेखन. म्हटलं तर विदुर महाजन यांचं व्यक्तिगत, पण प्रत्येक संवेदनाशील माणसाला अर्थपूर्ण जगण्यासाठी बळ देऊ शकेल असं.

मूल्य २०० रुपये; सवलतीत १२० रुपये; घरपोच १४० रुपयांत

# क्रांतदर्शी कलावंत कवी – खलिल जिब्रान

## द्वारकानाथ नेरूरकर

"Half of what I say is meaning less, but I say it so that the other half may reach you" – खलिल जिब्रान

सामान्य लेखकाची दृष्टी जीवनाच्या बहिरंगावर बहुधा खिळून राहिलेली असते. त्याच्या लेखनात सामान्य माणसाला थोडाफार विरंगुळा मिळतो. पण जीवनाच्या अंतरंगातील अनंत प्रदेशात काय काय चिजा साठवलेल्या आहेत, कोणकोणत्या प्रेरणा लपून राहिल्या आहेत, याचं दर्शन त्यांच्या लेखनात अभावनंच होतं. खलिल जिब्रानचं लेखन याला अपवाद आहे. त्याचं लेखन माणसाला अंतर्मुख करतं, विचार करायला लावतं.

जिब्रानच्या देशाचं नाव लेबनान. या देशाची सांस्कृतिक परंपरा हजारो वर्षांइतकी प्राचीन आहे. मिसर, असुर, खालिया या देशातील संस्कृतीच्या साऱ्या परंपरा अतिप्राचीन इतिहासात पंजीकृत झालेल्या आहेत. माऊंट लेबनान आणि त्याच्या आसपासचा प्रदेश हा यहुदी प्रेषितांची पुण्यभूमी. ख्रिस्ती धर्माचा संस्थापक येशू याच भागात जन्मला. येशूची जन्मभाषा आजही तेथे प्रचलित आहे. ग्रीक आणि रोमन संस्कृतीचे बरेवाईट सारे अवशेष तेथील संस्कृतीत सामावलेले आहेत. यहुदी आणि ख्रिस्ती धर्मानंतर त्याच सेमेटिक वंशात उदय पावलेला अत्यंत प्रभावी असा इस्लाम धर्मही या प्रदेशावर आपला खोल परिणाम करून गेला आहे. लेबनानची प्रमुख भाषा आजही अरबीच आहे आणि तेथील लोक यहुदी, ख्रिस्ती, इस्लामी अशा भिन्न भिन्न संप्रदायांचे असूनही संस्कृतीनं ते सारे एकच आहेत. आज त्यांचं एक स्वतंत्र राष्ट्रही बनलं आहे. अनेक पाश्चिमात्य संस्कृतींचादेखील या देशाच्या संस्कृतीवर परिणाम झाला आहे.

असा हा संस्कृतिसंपन्न प्रदेश कित्येक शतकं तुर्कांच्या साम्राज्याच्या जोखडाखाली होता. राजकीय पारतंत्र्य, धार्मिक अंधश्रद्धा आणि सामाजिक रुढींची गुलामगिरी यांच्या दडपणाखाली सामान्य जनतेचं जीवन पूर्णपणे बधीर होऊन गेलं होतं. जिब्राननं ज्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीच्या विरुद्ध आपलं व्यक्तिमत्त्व उभं केलं, तिचं स्वरूप हे असं होतं.

खलिल जिब्रानचा जन्म तेव्हाच्या सीरिया देशातील माउंट लेबनानमध्ये ६ जानेवारी १८८३ रोजी झाला. यहुदी लोकांचे पैगंबर याच प्रदेशात जन्म पावल्यामुळे इतिहासात त्याची फार प्रसिद्धी आहे. त्याचा जन्म मॅरोनाईट चर्चच्या संप्रदायात झाला होता. त्याच्या आईचे वडील हे त्याच चर्चमधील एक पुरोहित होते. त्यांच्या वडिलांचे वडील हे लेबनानमधील एक मोठे धनाढ्य गृहस्थ होते. जिब्रानच्या आईचं नाव कामिला. आणि वडिलांचं नाव खलिल. कामिलाचे ते तिसरे पती. खलिल–कामिला यांच्या पहिल्या मुलाचं नाव खलिल असंच ठेवण्यात आलं. खलिल याचा अर्थ 'निवडलेला' वा 'प्रिय मित्र' असा आहे. कामिला म्हणजे 'परिपूर्णा' आणि जिब्रान या शब्दानं 'आत्म्याला समाधान देणारा' असा अर्थ सूचित होतो. अरबी भाषेत 'ग' वर्ण नाही. त्यामुळे 'ग्रिबान'असा उच्चार होऊ शकत नाही. अरबीमध्ये जिब्रान याचं नाव 'जब्रान खलिल जब्रान' असं लिहिलं जातं. खलिलच्या पाठीवर कामिलाला आणखी दोन मुलं झाली. दोन्ही मुलीच. मोठी मॅरिआना आणि धाकटी सुलताना. शिवाय तिला पीटर नावाचा सावत्र मुलगाही होता.

जिब्रानचे वडील टॅक्स कलेक्टर होते. अफरातफरीच्या आरोपाखाली त्यांना तुरुंगवासाची शिक्षा झाली. त्यापायी त्यांची कौटुंबिक मालमत्ताही जप्त करण्यात आली. घरदार काही उरलं नसल्यामुळे कामिला आपल्या भावाबरोबर मुलांना घेऊन अमेरिकेला (बोस्टन) गेली, २५ जून १८८५ रोजी. आणि चरितार्थासाठी घरोघरी जाऊन गृहोपयोगी वस्तू विकण्याचा व्यवसाय तिनं पत्करला.

कवी जिब्रानच्या जीवनावर त्याची आई कामिला आणि बहीण मॅरिआना यांचा विशेष प्रभाव होता. कामिला ही अनेक भाषाकोविद् होती. ती अतिशय रुपवान होती आणि तिचा आवाज अत्यंत मधुर होता. कामिलाला मधुर आवाजाची देणगी तिच्या पुरोहित पित्याकडून मिळाली होती. कामिला लहानग्या खलिलला संध्याकाळी तासन् तास गाणी म्हणून दाखवी. हारुन अल् रशीदच्या पुराणकथा आणि अरबी लोककथा कामिलाच्या तोंडून जिब्राननं बालपणी ऐकलेल्या होत्या.

अमेरिकेत तो फार काळ राहिला नाही. दोन–तीन वर्षातच आपल्या जन्मभाषेचा अभ्यास करण्यासाठी तो अट्टाहासानं मायदेशाला परतला. बैरुतच्या अल् हिकमत पाठशाळेत त्यानं मॅट्रिकची परीक्षा दिली. त्याचवेळी अभ्यासक्रमाबाहेरील संगीत, वैद्यक,धर्म इत्यादी विषयांचा अभ्यासदेखील केला. त्यानं उच्च शिक्षण पूर्ण केलं. इ.स.१९०३मध्ये तो पुन्हा अमेरिकेत गेला आणि तिथे पाच वर्षं राहून चित्रकलेचा अभ्यास करण्यासाठी तो फ्रान्समध्ये आला.

इ.स.१९१२मध्ये पुनः अमेरिकेला (न्यू यॉर्क) आला आणि अंत होईपर्यंत तिथंच राहिला.

अरबी भाषेत त्यानं विपुल ग्रंथरचना केली आहे. अरबी भाषा जाणणारे लक्षावधी लोक त्याला अलौकिक प्रतिभेचा पुरुष मानतात. महाकवी, तत्त्वज्ञानी आणि चित्रकार म्हणून त्याची कीर्ती जगभर पसरली आहे. त्याच्या ग्रंथांची भाषांतरं विसाहून अधिक भाषांत झाली आहेत. त्यानं काढलेली चित्रं पाश्चात्त्य देशांतील प्रमुख शहरात दाखवली गेली आहेत.

खलिल जिब्रान जसा कवी होता, तसा चित्रकारही होता. कवी आणि चित्रकार असा योग फार दुर्मीळ. गुरुदेव रवीन्द्रनाथ टागोर, विल्यम ब्लेक, रसेल हे असे दुर्मीळ कलावंत. खलिल जिब्रान याची गणनाही याच मालिकेत करण्यासारखी आहे. त्याच्या चित्रातील मानवाकृती दिगंबर आहेत. तथापि त्यामुळे कुठेही पावित्र्याची हानी झालेली वाटत नाही. प्रख्यात शिल्पकार ऑगस्ट रेडिन यानं खलिलच्या चित्रांची तुलना विल्यम ब्लेक याच्या चित्रांशी केली आहे.

'द मॅडमन' हा खलिलचा पहिला इंग्रजी ग्रंथ. तो इ.स.१९१८मध्ये प्रसिद्ध झाला. यात त्याच्या प्रतिभेच्या बहुतेक छटा पाहवयास मिळतात. पुस्तकाच्या परिशिष्टात 'मी वेडा कसा झालो' या शीर्षकाखाली त्यानं ग्रंथाची कल्पना विशद केली आहे. त्याच्या सर्व पुस्तकात 'प्रॉफेट' हा ग्रंथ अग्रस्थानी आहे. ते अत्यंत सर्वश्रेष्ठ पुस्तक आहे. अमेरिका आणि इंग्लंडमध्ये या ग्रंथाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत. प्रसिद्ध आयरीश कवी आणि तत्त्वज्ञ जॉर्ज रसेल याने या ग्रंथराजाची प्रशंसा करताना म्हटलं आहे की, 'रवीन्द्रनाथ ठाकूर यांच्या नंतर कवी आणि चित्रकार खलिल जिब्रान याच्या 'प्रॉफेट' इतकी सुंदर वाणी पूर्वेकडून कानी आली आहे, असं मला वाटत नाही. विचारसौंदर्यात याला मागे असा ग्रंथ कित्येक वर्षात मी पाहिला नाही. आकार सौंदर्यापेक्षा विचारसौंदर्य मनाला अधिक मोहिनी घालतं असं सॉक्रिटिसानं 'बॅन्केट'मध्ये म्हटलं आहे, त्याचा अर्थ हा ग्रंथ वाचीत असता मला चांगला उमजला. पानागणिक मला यातून अवतरणं देता येतील', तर 'कंट्रीलाईफ' या नियतकालिकांत आलेला अभिप्राय असा, 'या ग्रंथाच्या लेखकानं जुनी सत्ये-आणि सत्ये जुनीच असतात-पण नव्या अधिकारयुक्त वाणीने सांगितलेली आहेत. जीवन, विवाह, बालके, श्रम, प्रेम, हर्ष, दुःख, मरण इत्यादी विषयांवर त्यानं निर्भयपणे लिहिलं आहे. ते लिहिताना त्याने निष्ठा, गंभीरता, कल्पकता आणि भाषासौंदर्य हे गुण इतके प्रकट केले आहेत की, कबीर आणि जलालुद्दीन, ट्रॅर्हन आणि ब्लेक यांच्या-सारख्या महान साक्षात्कारी लेखकांच्या पंक्तीत या ग्रंथकाराला बसविण्यात काहीच हरकत वाटत नाही.

वरवर पाहता अशा कवीचे काव्य गूढ भासते. जे गूढ ते दुर्बोध. आणि जे दुर्बोध ते अर्थशून्य अशी समीकरणे मांडण्याची आजकाल फॅशन झाली आहे. यामुळे साक्षात्कारी लेखनाला कमी लेखण्याचा एक संप्रदाय निर्माण झाला आहे. खलिलसारख्या कवीला त्याची जाणीव असते म्हणूनच तो आपण होऊन स्वतःला 'मॅडमन' (पागल) म्हणवून घेतो. कवी म्हणजे खासगत भावनांचा पसारा बाजारात मांडणारा पिसा असं श्री.पु.म.लाड यांनी आपल्या 'मधुपर्क' या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत म्हटलं आहे, त्याची इथं आठवण होते. वस्तुतः तोच खरा शहाणा म्हटला पाहिजे.

खलिल जिब्राननं चित्रकला आणि ललित साहित्य यांची आपल्या आयुष्यात अखंड समांतर उपासना केली. त्याची भूमिका प्रारंभापासून सौंदर्योपासक कलावंताची होती. प्रत्यक्ष राजकीय उलाढालीत तो कधीच पडला नाही. आरंभीच्या त्याच्या लिखाणात राजकीय आणि सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केलेला आढळतो. पण 'प्रॉफेट'नंतरच्या लिखाणात तो अध्यात्मिक विचारांकडे वळलेला दिसतो. त्याच्या कलेसाठीच त्याला चर्चने बहिष्कृत केलं होतं. तर तुर्की साम्राज्यसत्तेने त्याला मायदेशातून हद्दपार केलं होतं. खरं तर तो सौंदर्यदर्शी कलावंत होता. त्याच्या सौंदर्याची कल्पना मोहकतेला भेदून जीवनाच्या सत् स्वरूपापर्यंत पोचलेली होती. तो म्हणतो, ''माझ्या अंतरात्म्यानं मला सांगितलं की यांच्या पडद्याआड दडलेलं सौंदर्य तू शोधून काढ. जी जी वस्तू कुरूप व असुंदर समजली जाते, ती ती सुस्वरूप आणि सुंदर दिसू लागेपर्यंत तू तिच्याकडे टक लावून पहा. त्यानं मला अशी शिकवण दिली नव्हती; तोपर्यंत मला सौंदर्य हे धुराच्या लोटामधून दिसणाऱ्या दीपशिखेप्रमाणे भासत होते. परंतु आता धूर नाहीसा झाला आहे. आणि मला ज्योतीशिवाय काहीच दिसत नाही.

अशा या बंडखोर सौंदयदर्शी कलावंत कवीला यकृताच्या विकाराने (सायरोसिस) आणि क्षयाने (ट्युबर क्युलोसिस) गाठलं आणि त्यातच त्याचा अंत झाला, न्यूयॉर्कमध्ये, १० मे १९३१ रोजी वयाच्या ४८ व्या वर्षी.

तुर्की साम्राज्याच्या विनाशातून मध्यपूर्वेत जी जी नवी राष्ट्रं जन्मास आली ह्यात लेबनानच्या प्रजासत्ताकाची गणना प्रामुख्यानं करावी लागेल. या नव राष्ट्राच्या निर्माणामध्ये खलिल जिब्रानचं स्थान बरंच वरचं आहे. जिवंतपणी देशभक्तीच्या गुन्ह्यामुळे बहिष्कृत झालेल्या बंडखोराला त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या स्वतंत्र राष्ट्रानं आदरानं गौरवलं. जिवंतपणी त्याच्या सत्कार करण्याची संधी त्याच्या देशबांधवांना मिळाली नव्हती जी त्यांना मिळाली जिब्रानच्या मृत्यूनंतर. त्याचं शव अमेरिकेतून दरबारी थाटानं त्याच्या मायदेशी आणण्यात आलं आणि अत्यंत अभूतपूर्व जयजयकार करत त्याच्या बिशेरी या जन्मगावी तेथील ख्रिस्तीमदाच्या शेजारी ते दफन करण्यात आलं. आपलं दफन आपल्या मायभूमीत व्हावं अशी इच्छा त्याने मृत्यूपूर्वी आपली प्रेयसी मेरी हॉस्केल आणि बहीण मॅरिआना यांच्याकडे प्रदर्शित केली होती, ती अशा रीतीने पूर्ण झाली १९३२ साली.

---

**– द्वारकानाथ नेरुरकर**
शान्ता सदन,
९/३५ सरस्वती बाग,
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई – ४०००६०

# हिरवे अनुबंध

## दीपक पवार

'हिरवे अनुबंध' हे डॉ. द.ना. धनागरे यांचे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले. मुस्लिम विचारवंतांशी झालेल्या संवादावरचे पुस्तक आहे. डॉ. धनागरे यांचे घर संघ विचाराचे, पण धनागरे यांचे लेखन संघाच्या चष्म्यातून केलेले वाटत नाही. त्यामुळे ते अधिक मोकळे आणि चिकित्सिक झाले आहे. प्राध्यापक नुरुल हसन, ए.पी.जे. अब्दुल कलाम, मुनिस राजा, हामझा अलावी, डॉ. अली अश्रफ, डॉ. आरिफ महंमद गय्यूर अशा सहा विचारवंत, प्रशासकांबरोबर त्यांचा वेळोवेळी झालेला संवाद हा या लेखनाचा गाभा आहे. त्याला जोडून लाहोर भेटीत दिसलेला पाकिस्तान आणि वाशिमसारख्या छोट्या शहरातले हिंदू-मुस्लिम संबंध यावर दोन दीर्घ लेख त्यांनी लिहिले आहेत. एका अर्थाने, लेखकाचा यातून मुस्लिम समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यक्त होताना दिसतो.

डॉ. धनागरे यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांचे मराठीतील लेखन वयाची साठी उलटल्या-नंतरचे आहे. काही लेख कसदार उरतले आहेत, तर काही व्यक्तिचित्रणे सपक झाली आहेत. मात्र त्यात लेखकाचा संपूर्ण दोष नाही. ज्या व्यक्तींबद्दल हे लेखन आहे त्यांच्याशी लेखकाचा असलेला संपर्क हा नैमित्तिक आणि वैचारिकदृष्ट्या किरकोळ असल्याने लेखनातही त्याचे प्रतिबिंब पडलेले आहे.

दक्षिण आशियातील वेठबिगारीवर संशोधन करणाऱ्या प्रकल्प अधिकाऱ्यांच्या बैठकीसाठी लेखकाचे पाकिस्तानला जाणे होते. त्यावेळी व्हिसा देताना पाकिस्तानी दूतावासाने केलेली दिरंगाई पाकिस्तानच्या असुरक्षित मानसिकतेचे प्रतीक ठरते. भारतातून येणारी प्रत्येक व्यक्ती पाकिस्तानच्या सुरक्षिततेला धोका पोचवू शकते अशी भीती पाकिस्तानातल्या गुप्तचर यंत्रणेला वाटते. त्यामुळे ही पंचाईत होते. याउलट, तिथल्या पुस्तक प्रदर्शनामधील विक्रेती पाकिस्तानच्या इतिहासाचे पुस्तक लेखकाला फुकट देते आणि म्हणते, 'आप हमारे मेहमान है।' चर्चासत्रादरम्यान लेखकाला अनेक स्त्री-पुरुष भेटतात. त्यांच्याबद्दल जाणून घेण्याचा लेखकाचा प्रयत्न दिसतो. मात्र त्यातून गोळा होणारी माहिती फार भेदक किंवा सखोल नसते याची लेखकालाही जाणीव आहे. संशोधनाच्या परिभाषेत सांगायचे तर हे खूप छोटे सॅम्पल आहे. मात्र महत्त्वाची गोष्ट अशी की, या संपूर्ण प्रवासात लेखकाला काश्मिर प्रश्न, सिंधू नदीच्या पाणीवाटपाचा प्रश्न, दहशतवाद अशा कोणत्याही प्रश्नांवर लोक बोलताना दिसले नाहीत. याचा अर्थ सर्वसामान्य माणसांना या प्रश्नांनी फार फरक पडत नसावा किंवा आलेल्या पाहुण्यांशी या विषयांवर बोलून संवाद कठीण करावा असे कोणाला वाटत नसावे.

या निमित्ताने लेखकाला स्वत:चे बालपण आणि त्यात शिकवलेला इतिहास, भूगोल आठवला. भारत आणि पाकिस्ताना-तला सामान्य माणूस हे एकाच पूर्णत्वाचे अंश आहेत ही जाणीव लेखकाच्या मनात बळावली. या संदर्भात एक्कहार्ट टोलच्या ego's search for wholeness या संकल्पनेचा दाखला त्यांनी दिला आहे. अनेक विचारी भारतीय आणि पाकिस्तानी व्यक्तींना हे जाणवत असूनही भारत आणि पाकिस्तानमधील दरी मात्र वाढतेच आहे, ही विसंगती नजरेत भरते.

मध्ययुगीन भारतीय इतिहासाचे नामवंत प्राध्यापक आणि संशोधक नुरुल



हसन यांच्यावरच्या प्रकरणाने विचारवंतांच्या परिचयाला सुरुवात होते. ते शिक्षणमंत्री असताना लेखकाचा त्यांच्याशी संपर्क आला. आयआयटी कानपूरमध्ये संप झाल्याच्या पार्श्वभूमीवर धनागरे आणि इतरांचे शिष्टमंडळ हसन यांना भेटले. परिस्थिती चिघळेल असा कोणताही निर्णय शासन घेणार नाही असे आश्वासन हसन यांनी शिष्टमंडळाला दिले. नुरुल हसन यांची इंदिरा गांधीच्या राजकारणाशी बांधिलकी होती. त्यामुळे आणीबाणीनंतरच्या जनता लाटेत त्यांचे मंत्रिपद गेले. मात्र त्यांचा दरारा कायम राहिला. स्वत: हसन यांनाही ते आवडत होते असे दिसते. हसन यांचे मित्र आणि आयसीएसएसआर या संस्थेचे अध्यक्ष मुनिस राझा यांना त्यांच्या आजारपणाच्या काळातही अध्यक्षपदाच्या सर्व सोयीसवलती मिळत राहाव्यात यासाठी हसन यांनी धरलेला

आग्रह लेखकाला खटकला. हे मित्रप्रेम आहे की धर्मवेडेपणाची आणि अल्पसंख्याकांच्या अस्मितेची झलक ते लेखकाला कळत नाही. मात्र वर्षभर आजारी असणाऱ्या आपल्या मित्राने कौन्सिलचे अध्यक्षपद सोडावे अशी भावना हसन यांनी व्यक्त केली नाही याबद्दलची खेदाची भावना लेखकाने व्यक्त केली आहे.

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभा-साठी दिलेल्या आमंत्रणांच्या निमित्ताने त्यांची झालेली भेट लेखकाने दुसऱ्या प्रकरणात मांडली आहे. हा लेख मात्र भारावलेपणातून जास्त लिहिल्यासारखा वाटतो. डॉ. कलाम यांनी दीक्षांत समारंभाचे आमंत्रण स्वीकारणे, त्यांच्या व्यस्त कार्यक्रमांतून विद्यापीठाला त्यांच्यापर्यंत पोचता येणे, त्यांच्या आगमन आणि परतीच्या प्रवासातील गुप्तता आणि प्रत्यक्ष त्यांच्या सहवासातील रोमांचकारी क्षण यांनी हे प्रकरण व्यापले आहे. कलाम यांच्याशी फारसा संवाद मात्र घडलेला नाही. शिवाजी विद्यापीठ आणि बीएआरसी यांच्या संयुक्त प्रकल्पांची कलाम यांनी केलेली पाहणी, त्याबद्दल विचारलेले अभ्यासपूर्ण प्रश्न आणि 'या लोकांना अधिक निधी दिला पाहिजे' असा अनिल काकोडकरांना दिलेला प्रेमळ आदेश हा भाग लक्षणीय झाला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात या घटनेला खूप महत्त्व असले तरी व्यक्तिश: लेखकाला नवा स्नेहबंध जुळण्यापलीकडे खूप काही मिळाले असे या प्रकरणात जाणवत नाही.

दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरू आणि ज्येष्ठ विचारवंत मुनिस राझा यांच्यावरच्या प्रकरणात लेखकाने त्यांच्या वैचारिक खुलेपणाचा परिचय करून दिला आहे. राझा यांच्या कुलगुरूपदाच्या काळात डॉ. धनागरे यांना एका निवडसमितीचे सदस्य म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. प्रत्यक्ष मुलाखतींना सुरुवात करण्याआधी, छाननी समितीने स्वीकारलेल्या आणि नाकारलेल्या अर्जांमुळे कोणावर अन्याय झालेला नाही ना हे पाहण्याची विनंती धनागरे यांनी केली. एका अर्थी विद्यापीठ प्रशासन, छाननी समिती आणि काही प्रमाणात कुलगुरू कार्यालय यांच्याबद्दलही त्यातून शंका व्यक्त होत होती. मात्र एवढे असूनही राझा यांनी सर्व फायली समोर आणल्या. विद्यापीठात शिकवणाऱ्या व्यक्तीला एक न्याय आणि बाहेरच्याला दुसरा न्याय अशी वस्तुस्थिती त्यातून लक्षात आली. मुनीस राझा यांनी धनागरे यांचे कौतुक तर केलेच पण नंतर होणाऱ्या काही मुलाखतींमध्ये परीक्षक म्हणूनही बोलावले. त्यानंतर इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च या संस्थेचे राझा हे अध्यक्ष असताना धनागरे यांचा त्यांच्याशी पुन्हा संपर्क आला. धनागरे यांची कौन्सिलचे सदस्य-सचिव म्हणून नेमणूक झाली. अस्थिर राजकीय परिस्थितीमुळे नेमणूक होणे आणि प्रत्यक्षात पदभार सांभाळायला मिळणे यात खूप वेळ गेला. पदभार स्वीकारल्यानंतर धनागरे यांनी यापुढे अध्यक्षांकडे फायली परस्पर पाठवल्या जाऊ नयेत अशी अपेक्षा व्यक्त केली. राझा यांनी ती लगेच मान्य केली. एकदा राझा यांचा अनावश्यक खर्च धनागरे यांनी त्यांच्या सहीशिवाय मान्य करायला नकार दिला तेव्हा राझांची झालेली चिडचिड आणि संतापाच्या भरात 'आप'वरून 'तुम'वर येणे धनागरे यांनी चांगले नोंदवले आहे. राझा यांनी दिल्लीबाहेर पुण्यात आयसीएसएस-आरची परिषद घेऊन नवा पायंडा पाडला याची दखलही लेखकाने घेतली आहे. राझा हे इस्लामी मूलतत्त्ववादाचे कडवे विरोधक होते. त्यामुळे त्यांच्या कार्यालयातल्या एका मुस्लिम कर्मचाऱ्याने कार्यालयीन वेळात नमाज पढण्यासाठी स्वतंत्र खोली द्यावी अशी मागणी करून धनागरे यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला तेव्हा राझा धनागरे यांच्यामागे ठामपणे उभे राहिले. असली ड्रामेबाजी कौन्सिलमध्ये चालू देऊ नका असा स्पष्ट निर्वाळा त्यांनी दिला. आपल्या कारकिर्दीत जवळपास एकवीस महिने राझा हे हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभागात होते. मात्र या काळात त्यांनी पादभार सोडला नाही. त्यांच्या मित्रांनी त्यांना तसे करावे असे सांगितले नाही. त्यामुळे या काळात कौन्सिलचा पैसा त्यांच्या आजारपणासाठी खर्च झाला. आश्चर्य म्हणजे ही रक्कम हॉस्पिटलला देण्याऐवजी थेट आपल्याला देण्यात यावी असा राझा यांच्या पत्नीचा आग्रह होता. मात्र ते नियमबाह्य असल्यामुळे धनागरे यांनी तसे केले नाही. पर्यायाने त्यांनी राझा यांच्या कुटुंबीयांचा रोष ओढवून घेतला.

ससेक्स विद्यापीठामध्ये पीएच.डी.-साठी संशोधन करत असताना लेखकाचा हामझा अलावी या मार्क्सवादाच्या भाष्यकाराशी संपर्क आला. अलावी मूळचे कच्छी मुस्लिम कुटुंबातले. त्यांना अनेक भाषा येत असल्या तरी औपचारिक चर्चेत ते कटाक्षाने इंग्रजीचा वापर करत. पाकिस्तानचे सत्ताधीश याह्याखान यांच्या थिंक टँकचा ते भाग होते. मात्र पाकिस्तानमध्ये घडलेल्या घडामोडींनी व्यथित होऊन ते इंग्लंडमध्ये स्थायिक झाले. अलावी हे रॅडिकल मार्क्सवादी आहेत या संशयामुळे त्यांची ससेक्स विद्यापीठातील फेलोशिपची मुदत वाढवण्यात आली नाही. अलावी हे पाकिस्तानी नागरिक असल्यामुळे, धनागरे यांच्या प्रबंधासाठी बाह्य परीक्षक म्हणून त्यांची निवड झाल्यावर, त्यांनी धनागरे यांना याबद्दल आक्षेप नाही ना याची चौकशी करायला सांगितले. 'मध्यम दर्जाचा शेतकरी हाच शेतकरी चळवळींचा प्रेरक असतो' हा अलावी यांचा सिद्धांत धनागरे यांनी खोडून काढला असतानाही त्यांनी खुनशीपणाने त्यांची उलटतपासणी केली नाही. धनागरे यांचे विश्लेषण चांगले आहे, ते अभ्यासकांपर्यंत पोचावे यासाठी ते प्रकाशित करावे असेही त्यांनी सुचवले. इस्लाम, मध्य आशिया यांसारख्या विषयांवर अलावी यांनी सखोल चिंतन केलेले होते. जिहाद, भारताची फाळणी हे धर्मभावनेचा सत्तेसाठी वापर

करण्याचे साधन होते, त्यापेक्षा त्याला जास्त महत्त्व नाही अशी अलावी यांची भावना होती. फाळणीमुळे पॅन-इस्लामिझममध्ये कडवेपणा वाढला. ही असहिष्णुता आणि अविवेकीपणा अलावी यांना बोचत असावा असे लेखकाला वाटले. एम.सी. छगला यांच्यासारखेच अलावी हेही धर्माने मुस्लिम पण सांस्कृतिकदृष्ट्या हिंदू- भारतीय असावेत असे लेखकाला वाटले.

कानपूर विद्यापीठातले राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन विषयाचे सहकारी अली अश्रफ यांचे बिहारी ढंगाचे हिंदी, त्यांचे संशोधन, आयआयटी कानपूरमधील अस्मितांचे बाहुल्य (multiple identities) यांचे वर्णन लेखकाने एका प्रकरणात केले आहे. अश्रफ यांचे संशोधन आतंर-विद्याशाखीय स्वरूपाचे होते. मात्र आयआयटी कानपूरच्या समाजशास्त्र विभागात काम करावे लागल्याने हा लोकप्रशासन विषयाचा अभ्यासक उपरेपणाचा अनुभव घेत होता. त्यांनी कॉर्नेल विद्यापीठातून पीएच.डी. केली. पण प्रत्यक्षात पदवी हातात येण्याअगोदरच त्यांची रीडरपदी नेमणूक झाली. त्यामुळेही ते दबून असायचे. जामिया मिलिया विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून अनेक आघाड्यांवर संघर्ष करत त्यांनी यश मिळवले. त्यानंतर गांधीयन इन्स्टिट्यूट वाराणशी येथे त्यांनी प्रशासक म्हणून काम पाहिले. या सौजन्यमूर्तीशी असलेल्या आपल्या संबंधांचे मैत्रीत रूपांतर होऊ शकले नाही याची लेखकाला हळहळ वाटते. वाचक म्हणून आपल्यालाही अधिक मिळायला हवे होते असे वाटते.

१९६५ च्या भारत-पाक युद्धादरम्यान मॅसाच्युसेट्स विद्यापीठाची फेलोशिप घेऊन प्रा. धनागरे अमेरिकेत गेले तेव्हा त्यांना आरिफ महम्मद गय्यूर हा पीएच.डी.साठी आलेला पाकिस्तानी विद्यार्थी भेटला व त्यांचे मैत्र जुळले. दोघांनाही घरची आठवण यायची. या होम सिकनेसमुळे त्यांची मैत्रीही वाढली. लेखक आपली पत्नी आणि मुलगा यांना मायदेशी ठेवून आल्यामुळे त्यांच्या आठवणीने अधूनमधून त्यांना गलबलून यायचे. अशावेळी त्यांना समजून घेणारा संवेदनशील मित्र म्हणून गय्यूर यांचे खूप महत्त्व होते. १९६५ च्या युद्धानंतरच्या वाटाघाटींदरम्यान शास्त्रीजींचे निधन झाले. त्यानंतर मॅसाच्युसेट्समधल्या भारतीय विद्यार्थ्यांनी श्रद्धांजलीचा कार्यक्रम ठेवला. त्यात पाकिस्तानी विद्यार्थ्यांच्या वतीने शास्त्रींना श्रद्धांजली वाहिली म्हणून पाकिस्तानी मुलांनी गय्यूर यांच्यावर चक्क बहिष्कार टाकला! त्यांच्या या केविलवाण्या अवस्थेला आपणही जबाबदार आहोत असे वाटल्याने धनागरे यांनी गुरुवारच्या उपासाच्या दिवशी गय्यूर यांना गुरुवारचा ब्राह्मण म्हणून बोलावणे सुरू केले. त्यावर एका गुरुवारी गय्यूर यांनी एक वेळचा उपवास ठेवून तो धनागरे यांच्याकडे सोडला. पीएच.डी.च्या काळानंतर गय्यूर यांच्याशी लेखकाचा संपर्क राहिला नाही. स्त्रीवेड्या गय्यूर यांना त्यांच्या अमेरिकन पत्नीने घटस्फोट दिल्याचे व त्याचा त्यांच्यावर खूप गंभीर परिणाम झाल्याचे लेखकाला वीस वर्षांनंतर त्यांच्याशी झालेल्या भेटीत जाणवले. यापलीकडे या लेखात गय्यूर कळत नाहीत. त्यांच्याशी झालेला संवाद हा मुस्लिम विचारवंताशी झालेला संवाद या गटात मोडणारा नाही.

'हिरवे अनुबंध' या शीर्षकाचा लेखकाच्या वाशीम गावातल्या हिंदू-मुस्लिम नात्याचा वेध घेणारा लेख हा या पुस्तकातला सर्वांत उजवा लेख आहे. त्याचे शीर्षकही अन्वर्थक आहे. वाशीम हे १९०३ सालापर्यंत जिल्ह्याचे ठिकाण होते. नंतर ते अकोल्यात विलीन झाले आणि आता पुन्हा तो जिल्हा झालाय. धनागरे यांचे घर संघाचे. डॉ. हेडगेवार वाशिमला आल्यावर त्यांच्या उपस्थितीत संघकार्याला वाहून घेण्याचे ठरवलेल्या लोकांमध्ये लेखकाचे वडील होते. वाशिमसारख्या दंगलींचा इतिहास असलेल्या या शहरात पेशाने वकील असणाऱ्या नारायण धनागरेंचे अशील मुस्लिमही होते. मुस्लिम वकील त्यांच्याकडे सल्लामसलत करायला येत. एवढेच कशाला, त्यांच्या नव्या घराचे बांधकाम उस्मानभाई या मुख्य गवंड्याच्या मार्गदर्शनाखाली झाले. मनोऱ्यावरच्या गिलाव्यात उस्मानभाईने नाग कोरले आणि योगायोगाने त्याच रात्री घरात मोठा साप निघाला. त्यामुळे अंधश्रद्ध मंडळींनी मनोऱ्यावर कोरलेला नाग काढून टाकायला लावला. त्यामुळे दुखावलेल्या उस्मानभाईने ते कामच सोडून दिले. मुस्लिमांशी संबंध असले तरी त्यांची ताटे वेगळी असायची किंवा ते वेगळे जेवायचे हेही लेखकाने नमूद केले आहे. टांगेवाले कौसर आणि छोटू, बाररुममसाठी नेमलेला शिपाई दादूमियाँ, जवळपास डिपार्टमेंटल स्टोअरइतके मोठे दुकान चालवणारे वलीमहंमद अॅण्ड ब्रदर्स, हार्डवेअरचे दुकान चालवणारे नौमनअली हे तिथल्या गावगाड्याचे अविभाज्य घटक होते. एका दंगलीत वलीमहंमदचे दुकान लुटले गेले, लाखोंचे नुकसान झाले तरी ते फिनिक्स पक्ष्याप्रमाणे पुन्हा उभे राहिले. दरवर्षीप्रमाणे तिथे दिवाळीतले लक्ष्मीपूजनही झाले. धनागरे यांच्या वडिलांनाही मुसलमानाघरचा लक्ष्मीपूजनाचा प्रसाद कसा खायचा असा प्रश्न पडला नाही.

पीएच.डी. चे संशोधन पूर्ण करून भारतात आल्यावर लेखक आणि त्यांचे बंधू गावात फेरफटका मारायला निघतात, तेव्हा त्यांना नालसाहेब दर्ग्याची मिरवणूक दृष्टीस पडते. लेखकाने त्या मिरवणुकीत नाचणाऱ्या मुलाला दहा रुपयाची नोट दिल्याचे त्यांच्या भावाला आवडत नाही. या फुटीरतावादी आक्रमक लोकांच्या अपप्रवृत्तींना खतपाणी घालून त्यांना प्रोत्साहन कशाला द्यायचे असा त्यांचा प्रश्न असतो. त्यावर लेखक त्यांना १९११ च्या जनगणना अहवालातील सर विल्यम गेट यांच्या प्रस्तावनेचा दाखला देतात. ऐंशी टक्क्यांहून अधिक मुसलमान ही अठराव्या शतकानंतर धर्मांतर केलेल्या हिंदू कुटुंबीयांचीच प्रजा आहे हे त्यांच्या लक्षात

आणून देतात. दलितांना उर्वरित समाजाने हीनपणाने वागवल्यामुळेच आर्थिक कारणांमुळे, आपला सामाजिक दर्जा उंचावेल या भावनेने लोकांनी धर्मांतर केल्याचे ते सांगतात. इथे लेखकातला समाजशास्त्रज्ञ जागा झाल्याचे दिसते. वाशिममधल्या मध्यमेश्वर या विलक्षण देवळाचा उल्लेख या प्रकरणात आहे. जिथे अक्षांश व रेखांश एकमेकांना छेदतात, असा भारतीय उपखंडाचा मध्यबिंदू म्हणून तिथे मध्यमेश्वराचे मंदिर व वेधशाळा असे संकुल होते. मधल्या काळात ती जागा एक मुस्लिम स्त्रीच्या ताब्यात गेली होती. तिच्याकडून ती परत घेऊन, कोणताही जातीय विद्वेष निर्माण न करता तिथे शंकराच्या पिंडीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. याचा अर्थ, अशा वादग्रस्त जागांचे प्रश्न सामंजस्याने आणि सलोख्याने सुटू शकतात. त्यानिमित्ताने अयोध्येच्या प्रश्नावरचे, 'मताचे राजकारण आणि राजकारणी यांना अयोध्येत बंदी केली तर मंदिर-मशिदीचा वाद त्या ठिकाणचे हिंदू-मुसलमान कुठल्याही न्यायालयाच्या हस्तक्षेपाविना सोडवतील' हे त्यांच्या एका मित्राचे मार्मिक मतही ऐकवतात.

सभोवती मुस्लिम वस्ती असलेल्या मध्यमेश्वराच्या देवळात लेखकाची आई रोज दिवेलागणीच्या वेळेला निर्धास्तपणे जायची. हा निर्धास्तपणा हेच तिथल्या हिंदू-मुस्लिम नातेसंबंधांचे, विद्वेषाचे अपवादात्मक प्रसंग वगळता, वैशिष्ट्य होते असे लेखकाला वाटते. विवेकी नेतृत्वाच्या अभावी वाशिममध्ये १९६६ साली झालेल्या दंगलींचाही लेखकाने उल्लेख केलाय. अयोध्या, गोध्रा आणि अहमदाबादेत झालेल्या घटना हाही विवेकी नेतृत्वाच्या अभावाचा परिणाम आहे असे निरीक्षणही नोंदवलेय. एका हिंदुत्ववादी कुटुंबातून पुढे आलेल्या व्यक्तीचा हा मानसिक प्रवास खूप मोठा, दमवणारा असणार यात शंका नाही.

पुस्तकाच्या शेवटी मुस्लिमांच्या वाट्याला आलेला हिरवा रंग का बदनाम झाला असावा याचे विश्लेषण लेखक करतो. हिंदूंनाही समृद्धीचा, सौभाग्याचा, बालकवींच्या कवितेचा म्हणून हिरवा रंग आवडतोच. राष्ट्रध्वजातही तो आहेच. तरी हिरवा रंग शापित का ठरावा असा लेखकाला प्रश्न पडतो.

फक्त सव्वाशे पानांचे हे पुस्तक आहे. काही ठिकाणी- विशेषत: वाशिमवरच्या लेखात, लेखकाच्या चित्रदर्शी शैलीचा प्रत्यय येतो. ज्या लेखांमध्ये लेखकाकडे संबंधित व्यक्तींसोबतच्या अनुभवाचे भांडवल कमी पडले, तिथे लेख सपक झाले आहेत. पण डॉ. धनगरेंसारख्या आतंरराष्ट्रीय कीर्तीच्या समाजशास्त्रज्ञाला जग फिरून आल्यावरही आपले लेखन मातृभाषेतून यावेसे वाटते हीच दिलासा देणारी गोष्ट आहे. धनागरेंनी इंग्रजीतून विपुल संशोधनात्मक लेखन केले आहे. ते मराठीतून आणण्याच्या कामाला त्यांनी तरुण संशोधकांना जुंपले पाहिजे. त्यांच्या प्रगल्भ बुद्धीचे यानंतरचे संशोधनात्मक आविष्कार प्रथम मराठीतूनच यावेत यासाठी त्यांनी आग्रही राहिले पाहिजे. तरच त्यांची ही लेखनयात्रा सुफळ संपूर्ण होईल.

हिरवे अनुबंध  
दत्तात्रेय नारायण धनागरे,  
मौज प्रकाशन, २००९  
पाने १२४, किंमत १०० रुपये

---

**- दीपक पवार**  
भ्रमणध्वनी : ९८२० ४३७ ६६५  
deepak@marathivikas.org

---

मागील अंकात अनावधानाने फक्त इंग्रजी मजकूर छापला गेला होता. ते मूळ पत्र असे-

'रुची'दिवाळी अंकातील 'पाकिस्तानची गाणी' या योगेन्द्र जावडेकर यांच्या लेखात '...त्यांना मान्य होणंच शक्य नव्हतं... ते एकच सांगत...ही त्यांची ठाम समजूत आहे...' इत्यादी उल्लेख येतात. कृपया ध्यानात घ्यावे की सदर लेखात ज्या काही निष्कर्षांचा उल्लेख आहे ते माझे नाहीत, तर गेल्या सुमारे पन्नास वर्षांतील अभ्यासात मला अत्यंत विश्वासार्ह अशा थोर लेखकांच्या आणि संतांच्या ग्रंथांत त्यांनी त्यांच्या प्रचंड अभ्यासांतून काढून दिलेले आहेत. ज्याला वाचायला सवड आहे त्याला अशा प्रकारचे निष्कर्ष अनेकानेक ठिकाणी दिसतील. वेल्स आणि विवेकानंद यांचे इतिहासनिष्कर्ष नोंदत आहे.

**A Short History of the World- H. G. Wells, Pelican Books, Penguin Books, Harmondsworth. Middlesex, 1949.**

Page 178... there remains in Islam, this faith he (Muhammad) imposed upon the Arabs, much power and inspiration. One characteristic is its uncompromising monotheism... Another is its complete detachment from the sacrificial priest and the temple. It is an entirely prophetic religion... And a third element of strength lay in the insistence of Islam upon the perfeact brotherhood and quality before God of all believers... he (Caliph Abu Bakr) set himself simply and sanely to organise the subjugation of he whole world to Allah...

Page 180.... Egypt fell almost without resistance to the new conquerors, who, full of a fanatical belief in the sufficiency of the Koran, wiped out the restiges of the book-copying industry of the Alexandrian Library.

**Modern India- Swami Vivekanand**, Advait a Ashram, Almora, 1946

Page15... Under the Mussulman rule, the king himself was the supreme priest,... the paramount leader in all matters... To the Mussulman, the Jew or the the Christian is not an object of extreme detestation; they are, at the worst, men of little faith. But not so the Hindu. According to him the Hindu is idolatrous, the hateful kafir hence, in this life he deserves to be butchered; and in the next, enternal hell is in store for him.

...If the religious ardour of any king was little more uncommon, there would immediately follow arrangements for a great Yajna, by way of kafir- slaughter!

**- मुरलीधर जावडेकर**  
म्हाडा एचआयजी बिल्डिंग १,  
ब्लॉक नं.९  
संत तुकाराम मार्ग, पिंपरी,  
पुणे-४११०१८  
मो. ९८९०१६९१५

# सत्तेचा मद चढलेले तीन चित्रपट

## आदिनाथ हरवंदे

पहिलं आणि दुसरं महायुद्ध संपून ६५ वर्षे उलटली. मात्र त्यावरील चित्रपट काढण्याची खुमखुमी अद्याप संपत नाही. विशेष म्हणजे ही निर्मिती लाटेवर स्वार होऊन पाट्या टाकल्यासारखी नसते. एखाद्या घटनेचा सखोल अभ्यास करण्याची वृत्ती अशा युद्धपटांत दृग्गोचर होते.

दुसऱ्या महायुद्धात हिटलरची जर्मनी एकामागोमाग एक देश पादाक्रांत करत होती. त्याचबरोबर ज्यूंबाबतच्या विद्वेषातून सामूहिक नरसंहार होत होता. नाझींच्या युद्ध पिपासा आणि ज्यू निःपात अशा दोन अनर्थकारक प्रवृत्तींनी सर्व जगाला वेठीस धरलं होतं. ज्यू लोकांवरील सर्वनाशक हल्ल्यावर पाश्चात्य देशांत अनेक चित्रपट निर्माण झाले. ऑस्कर विजेता 'शिंडलर्स लिस्ट' हा त्यांपैकी एक. त्याच विषयावरील 'डिफायन्स' हा २००८ साली निर्माण झालेला चित्रपट यंदाच्या 'मामी' महोत्सवात पाहायला मिळाला.

१९३९ मध्ये जर्मनीनें फ्रान्स आणि पोलंड ह्या राष्ट्रांवर कब्जा मिळवला आणि युद्धाची सुरुवात झाली. ज्यूंचा नायनाट करताना नाझींना ज्यू नागरिकांचा विरोध झाला नाही. मुकी बिचारी मेंढरं अशा पद्धतीनं ते मरणाच्या स्वाधीन झाले. जिंकलेल्या देशांच्या राज्यकर्त्यांनी तो संहार उघड्या डोळ्यांनी पाहिला. किंबहुना, वेळ पडल्यास नाझींना मदत केली. पराभूत राष्ट्र दुसरं काय करणार?

ज्यू समाज छळछावण्यांकडे बेगुमानपणे जात असताना पूर्व युरोपाच्या सीमेवरील खेड्यातील ज्यू रहिवासी स्वतःचे प्राण वाचवण्यासाठी जंगलात पळतात. तुविया, झुस आणि असायल ह्या तीन बेलस्की भावांना आणखी लोक येऊन मिळतात. सर्व वयोगटांच्या त्या जमावाला एका खेडयाचंच स्वरूप प्राप्त होतं. सर्व प्रकारची काम करणारे लोक; अगदी दारू गाळणारे त्या समूहात असतात. मात्र त्यांना खेड्याप्रमाणे स्थैर्य नसतं. नाझींची नजर चुकवून सतत स्थलांतर करावं लागतं.

तुविया त्यांना लढण्यास आणि प्रतिकार करण्यास उद्युक्त करतो. मान खाली घालून मेंढरांप्रमाणे छळछावण्यांकडे जायचं नाही. स्त्रियांपासून म्हाताऱ्याकोताऱ्यांना काम करण्याचं महत्त्व पटवून देतो. टेहळणी करण्याच्या कामातही स्त्रियांनी मागं राहायचं नाही. जगायचं निश्चित झाल्यावर अनेक गरजा पूर्ण करणं, हे ओघानं आलंच. त्यासाठी जीवनोपयोगी साहित्य, धान्य आणि शस्त्रांची लूट करण्यासाठी नागरीवस्तींवर हल्ले करण्याचा मार्ग ते अवलंबातात.

नाझी त्यांना मोकळं सोडायला तयार नसतात. मात्र जीव वाचवण्यासाठी धडपडणाऱ्या ह्या जमावाला पुष्कळ वाटा, टेकड्या, दऱ्या अशा रूपानं निसर्गाचं वरदान लाभतं. तसंच मारलेल्या जर्मन सैनिकांकडून शस्त्रांस्त्रांची लूट मिळते.

अखेर, ह्या जमावाला नेस्तनाबूत करायचंच ह्या हेतूनं जर्मन सैनिक रणगाड्यांसह निकराचा हल्ला करतात. त्यावेळी जमावातील अनेक लोक कामी येतात. पण ते शरणागती पत्करत नाहीत. जे वाचतील ते ताठ मानेनं जगतील हा स्वाभिमान त्यांना जिद्द आणि शौर्य देतो.

''आपण फक्त मरणाच्या कामाचे का?'' असा प्रश्न बेलस्कीपैकी एक भाऊ विचारतो. त्या उद्गारात फार मोठी शक्ती असते.

उघडपणे केलेल्या विरोधातून स्वातंत्र्याची सुरुवात होते. त्यानुसार जर्मनीच्या अखेरचा हल्ला परतवल्यानंतर हा जमाव त्या जंगलात गाव वसवतो. प्राथमिक शाळा, औषधाची आणि इतर वस्तूंची दुकानं, दवाखाना इत्यादी सोयींसह!

तुविया बेलस्कीच्या भूमिकेत डॅनियल क्रेग कमांडरच्या लढाऊ आणि निग्रही गुणांचं



'डिफायन्स'मधील दृश्य

समर्थपणे दर्शन घडवतो. प्रवचन करणारा वृद्ध, कमांडरला आव्हान देणारा आततार्इ तरुण, कमांडरवर जीव टाकणारी तरुणी अशा छोट्या भूमिकेतील अभिनेत्यांनी समरस होऊन भूमिका केल्या आहेत.

'डिफायन्स'चे दिग्दर्शक एडवर्ड झ्विक रंगभूमीच्या माध्यमातून सिनेमाकडे वळले. त्यांचं हार्वर्ड विद्यापीठात वाङ्मयाचा अभ्यास करत असताना नाट्यलेखन-दिग्दर्शन सुरू झालं होतं. चित्रपटातही पटकथा, लेखन, निर्मिती आणि दिग्दर्शन अशा क्षेत्रात ते एकाच वेळी मुशाफिरी करतात. ह्यापूर्वीच्या 'ट्रॅफिक'ह्या चित्रपटाला ऑस्कर नामांकन मिळवणाऱ्या झ्विकच्या कलात्मकेची भरारी डिफायन्स मध्येही पाहायला मिळते. जीव वाचवण्यासाठी सतत पळणारा आणि शत्रूला जशास तसं उत्तर देणारा समुदाय. संपूर्ण चित्रपटात संताप, द्वेष, निर्धार, धडपड, कष्ट, जागरुकता सामुदायिकपणे प्रकट करण्यात झ्विक ह्यांचं कौशल्य दिसतं. तसंच काही स्त्रियांची आणि वृद्धांची अगतिकता चटका लावणारी.

समुदायाची मानसिकता आणि विरोध करण्याची वृत्ती उपरोधिकपणे दाखवणारा रुमानियाचा 'सायलेंट वेडिंग' चित्रपट पाहायला अपेक्षेप्रमाणे गर्दी झाली. ह्या चित्रपटाचे दिग्दर्शक होराटिऊ मालाइले हेसुद्धा नाटकाकडून सिनेमाकडे वळले. त्यांचा हा पहिलाच चित्रपट त्यांच्याविषयी भरपूर अपेक्षा निर्माण करणारा.

अनुबोधपट बनवणारी एक कंपनी. एका खेड्यात अनुबोधपट तयार करण्यासाठी येते. ते खेडं निवडण्यामागचं कारण वेगळं असतं. तिथं वृद्ध महिलांची संख्या जास्त. किंबहुना पुरुषांचं अस्तित्व नगण्यच- हे एक नवल! उत्सुकतेपोटी ते उलगडण्याचा अनुबोधपटाचा खटाटोप.

१९५३ च्या वसंत ऋतूतील ही कहाणी. खेड्यात मोजकीच माणसं एकमेकात गुंफलेली. गावातला एकच गुत्ता हे संध्याकाळ झाल्यावर पुरुषांचं भेटण्याचं ठिकाण. बिनकामाचे म्हातारे केव्हाही त्या गुत्त्यात येतात. वेळ घालवण्यासाठी! तिथं एक गावभवानी. कोणी पाजली तर आनमान करायचा नाही आणि कोणाबरोबर जायला नकारही द्यायचा नाही. अन्यथा, म्हाताऱ्यांची टिंगल आणि गावातल्या चांभारचौकश्या. कम्युनिझमची टवाळी करणं हा सर्वांचा आणखी एक आवडता विषय. त्या गुत्त्यात मारा आणि लँकु ह्यांची प्रेमकहाणी चवीचवीनं उगाळली जाते.

त्या प्रेमी युगुलाच्या शेतातील चैनीवर दुर्बिणीतून बारीक लक्ष ठेवणारा पोक्या त्याचं रसभरीत वर्णन करतो तेव्हा गुत्त्यात दोघांचे वडील असतात. लँकुचा बाप माराच्या बापाला बजावतो, ''तुझ्या पोराला आवर.''

माराचा बाप शेरास सव्वाशेर. तो लँकुच्या बापाची चेष्टा करातो, ''मी त्यांना धडे देत नाही.''

दोघांची चांगलीच जुंपते. त्यांना सोडवताना सर्वांची तारांबळ उडते. त्या गदारोळात माराचा गुत्त्यात प्रवेश होतो. तो तारस्वरात घोषणा करतो, ''मी लँकुशी विवाह करणार.''

सर्व गुत्ता स्तब्ध होतो. क्षणापूर्वी एकमेकांच्या जिवावर उठलेले दोन म्हातारे एकमेकांना कडकडून मिठी मारतात. आनंद साजरा करताना लग्नाचा मुहूर्त आणि इतर व्यवस्थविषयी चर्चा रंगते.

९ एप्रिल, १९५३ हा मुहूर्त. इथे लग्नाची जय्यत तयारी होते. नवरा-नवरी नटूनथटून चर्चकडे निघतात. सर्व खेडं त्यांच्याबरोबर असतं. इतक्यात कम्युनिष्ट राजवटीचा स्थानिक प्रमुख तिथं अवरतो.

''स्टॅलिनचा मृत्यू झालाय. त्यांना आदरांजली म्हणून सात दिवसांचा दुखवटा पाळण्यात येईल''

गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्य आणि तिरस्कार. ह्या कम्युनिस्टांना कशातच रस नसतो, असं पुटपुटतात.

एका बटालियन सैन्याचा अधिपती असलेला तो स्थानिक प्रमुख पुढे सांगतो, ''लग्न, नाचगाणी, मेजवानी, इत्यादी आनंददायक समारंभावर सात दिवस बंदी आहे. हा विवाह सात दिवसांनंतर साजरा करा.''

सर्व गावाला मेजवानी, जेवण तयार, बँडवाले हजर, सर्व गाव नटलेला. पण रशियन कर्नलच्या फर्मानानं उत्साह ओसरतो. आता काय करायचं ही चिंता.

गावकरी उघड्या जागेवरील मंडप गुंडाळतात. मेजवानीचं टेबल, जेवणाचे टोप, दारूच्या बाटल्या इत्यादी साहित्य आटोपतात; समारंभ स्थगित झालाय, असा देखावा करतात.

मात्र लगेच अत्यंत वेगानं हे सर्व साहित्य एका लांबलचक घरात जातं. कोणताही आवाज न करता सर्व मांडामांड होते. आवाज झाला तर रशियन अधिकाऱ्याला समारंभ सुरू असल्याचं



'सायलेंट वेडिंग'मधील दृश्य

कळेल, त्यामुळे सर्व क्रिया मुकाटपणे होते, जणू मूक चित्रपट पाहतोय. सर्व मंडळी लांबलचक टेबलाच्या दुतर्फा बसतात. नवरा-नवरी टेबलाच्या एका टोकाला जोडीनं बसतात. बँडवाले नेमलेल्या जागी उभे राहतात. काटे-चमचे ह्यांचा आवाज होतोय हे जेवणाला सुरुवात करताच लक्षात येतं. ताबडतोब काटेचमचे एकत्र जमवतात. अलगद, सावकाश, आवाज न करता.

थोडसं हातानं खाल्ल्यानंतर ग्लासात दारू आतायला सुरुवात होते. पहिल्याच ग्लासात दारू ओतताना आवाज येतो. त्यावर उपाय म्हणून ग्लास तिरपा करून बिअरप्रमाणे दारू ओततात.

इतक्यात एक विचित्र परिस्थिती निर्माण होते. जाडे आणि म्हातारे हवा सोडायला सुरुवात करतात. हा आवाज होताना त्या म्हाताऱ्याच्या चेहऱ्यावरील अगतिकता आणि इतरांचा हसू दाबण्याचा प्रयत्न बघताना प्रेक्षकांना हसू आवरत नाही. अखेर नवऱ्याचा बाप दारूच्या बाटलीचं बूच दाखवून हवेचा मार्ग बंद करण्याचा अविर्भाव करतो. तेव्हा प्रेक्षागृहात हास्याचा बांध फुटतो.

नवरा-नवरी नाचायला उठतात. अलगद पाऊल टाकत ती दोघं किंचित मोकळ्या जागी येतात. बँडवाले वाद्य वाजवायचा केवळ अभिनय करतात. त्या तालावर(!) नवरा-नवरी बुटांचा आवाज न करता नाचतात. ते अगदी कठपुतळीसारखं वाटतं. इतर लोक टाळ्या वाजवतात, आवाज न करता.

अचानक पाऊस सुरू होतो. हळुहळू पावसाचं संगीत वाढतं. वादळाचा धिंगाणा सुरू होतो. वारा थैमान घालू लागतो. खिडक्यांनी तावदानं फोडून सूऽऽसूऽऽ करत वारा आत शिरतो. नवऱ्याच्या बापाला चेव चढतो. दारूचा ग्लास तोंडाला लावून तो सर्व बंधनं झुगारून देतो. निसर्गाच्या ह्या तांडवापुढे आपला आवाज कितीतरी क्षीण वाटेल म्हणून सगळे मुक्तपणे नाचतात. बँडवाले खरी वाद्यं वाजवतात.

ह्या तल्लीनतेचा बंदुकीच्या आवाजानं भंग होतो. सर्वांचा अंदाज चुकतो रशियन येतात. पुरुषांना पकडून ट्रक भरतात. त्यापैकी कोणी परतत नाही.

सकाळ होते. गावावर काळी छाया. धूसर आसमंत. गावात फक्त काही स्त्रिया आणि एक छोटा मुलगा. सुंदर विनोदाची पखरण असलेल्या ह्या चित्रपटाचा हा चटका लावणारा शेवट!

इटलीचा बेनितो मुसोलिनी हा क्रूर हुकुमशहा. दुसऱ्या महायुद्धात हिटलरच्या साथीनं जग जिंकायची अभिलाषा बाळगणारा पाषाणहृदयी माणूस. त्याच्या आयुष्यात अनेक स्त्रिया आल्या. पण पारंपरिक कुटुंबवत्सल अशी प्रतिमा जनमानसात रुजवण्यासाठी मुसोलिनीनं अमर्याद सत्तेचा वापर करून सर्व प्रकरणं दडपली.

त्याच्या कारकिर्दीची सुरुवात झाली संपादक म्हणून. समाजवादाचा कट्टर पुरस्कार करणाऱ्या मुसोलिनीचं व्यक्तिमत्त्व, वक्तृत्व आणि विचारसरणी ह्या त्रिसूत्रींवर स्त्रिया मोहित व्हायच्या. त्यापैकी इदा दालसेर ही पहिली स्त्री. मुसोलिनी तेव्हा इटलीच्या राजकीय क्षितीजावर नुकताच अवतरला होता. राजसत्तेविरूद्ध लढा उभारण्यासाठी मुसोलिनीला वृत्तपत्र काढण्याची तीव्र इच्छा होती. अडचण होती पैशाची. इदानं घरादारासह सर्वस्व विकून मुसोलिनीची इच्छा पूर्ण केली. १९१४ मध्ये मुसोलिनी ट्रेंटो इथं इदाशी विवाहबद्ध झाला. इदानं मुलाला जन्म दिला. त्याचवेळी मुसोलिनी पहिल्या महायुद्धात इटलीच्या सैन्यामध्ये दाखल झाला.

युद्धावरून जखमी अवस्थेत परतल्यानंतर मुसोलिनीला भेटायला इदा सैनिकी रुग्णालयात गेली. त्यावेळी तिथं रिशेले गुइदीं ही मुसोलिनीची दुसरी पत्नी उपस्थित होती. ''मुसोलिनी माझा नवरा आहे,'' असा दोघी दावा करू लागल्या. मुसोलिनी गप्प राहिला. त्याला सत्ता मिळवण्याचे वेध लागले होते.

२७ ते २९ ऑक्टोबर, १९२२ ह्या कालावधीत त्यानं 'चला रोम' हा धडाकेबाज मोर्चा काढला. त्याचा फार मोठा परिणाम झाला. तिसरा विक्टर इमॅन्युएल ह्या राजानं २८ ऑक्टोबर रोजीच मुसोलिनीच्या 'नॅशनल फॅसिस्ट पार्टी'कडे सत्ता सोपवली. भांडवलशाही विरोध, कम्युनिस्ट विरोध, सर्वाधिकार आणि स्वदेशाभिमान ह्या चार स्तंभावर त्याचं शासन सुरू झालं.

'विनसेरे' चित्रपटाच्या उत्तरार्धात दिग्दर्शक मार्को बेलोसिको ह्यांनी जुन्या माहितीपटातील मुसोलिनीचं चित्रण वापरलं आहे. मुसोलिनीची सर्वसत्ताधीश ह्या



'विनसेरे'मधील दृश्य

ध्येयाकडे होणारी वाटचाल व इदा आणि तिचा मुलगा ह्यांना सर्वनाशाकडे घेऊन जाणारा भोवताल ह्या समांतर रेषेतील घटना. दोन्हीचा कर्ताकरविता मुसोलिनी.

पूर्वार्धातील मुसोलिनीच्या भूमिकेत जिओवाना मेझोइरनो ह्यानं उत्तरार्धातील व्यक्तिरेखेचं दर्शन सार्थ ठरावं असा समतोल साधलाय. फिलिपो टिमी हिनं इदाची असहायता आणि हक्क मिळवण्याची धडपड फार समर्थपणे दाखवली आहे. सर्व स्तरावरील अधिकारी आणि डॉक्टर, ''मी मुसोलिनीची पत्नी आहे हे वेड डोक्यातून काढ'' असंच तिच्या मनावर बिंबवत असतात.

'' मी वेडी नाही'' ती ठामपणे सांगते. पण तिच्या म्हणण्याला दुजोरा मिळेल असा एकही कागद अस्तित्वात राहिलेला नसतो. तिच्यापासून मुलाची, अल्बिनोची फारकत करण्यात येते. त्या कोवळ्या मुलाला हॉस्टेलच्या एका मोठ्या हॉलमध्ये ठेवण्यात येतं. ४०-५० खाटा असलेल्या त्या हॉलमध्ये तो एकटा. मानसिक तोल ढळणार नाही, असं होईल का? शाळा-कॉलेज सर्व शिक्षण सुरू. तो सर्वांना सांगतो, ''मी मुसोलिनीचा मुलगा.'' इतर मुलं त्याला चिडवतात. त्याला मुसोलिनीची नक्कल करायला लावतात. तो सांगत असतो, ''मला आईकडे न्या. सर्व व्यवस्थित होईल.'' तिकडे आई विनवणी करते. ''माझ्या मुलाशी माझी गळाभेट होऊ द्या.''

हे सर्व प्रसंग दिग्दर्शक बेलोसिको अतिशय उत्कटतेनं रंगवतात. त्या सर्व दृश्यांवर मुसोलिनीची काळी छाया असावी असा भास होतो.

हृदयशून्य मुसोलिनी लाखो माणसांच्या जमावापुढे भाषण करताना दिसतो. श्रोत्यांना कैफ चढतो. कमरेवर हात ठेऊन शब्दांचे अग्निबाण सोडणारा मुसोलिनी मध्येच हात उंचावतो. मूठ आवळून आवाज टिपेला नेतो आणि मूठ समोरच्या पोडियमवर दाणकन आदळते. गर्दीतून टाळ्यांचा गडगडाट आणि चित्कार. निव्वळ बेहोषी!

पुढच्या दृश्यात इदा आणि अल्बिनो ह्यांची छळवणूक.

अखेर अल्बिनो वेडा होतो. इदा न्याय मिळावा म्हणून अनेकांना पत्रं लिहिते. रुग्णालयाच्या लोखंडी ग्रिल्सवर चढून ती पत्रं हवेत फेकते. हा तिचा केविलवाणा उद्योग सतत चालू असतो.

हा चित्रपट पाहताना इतिहास माहीत असलेला प्रेक्षकही खुर्चीत खिळून बसतो.

ह्या वर्षीची ही निर्मिती. केन्स आणि टोरोंटो महोत्सवात ह्या चित्रपटाचा समावेश झाला होता.

असे हे सत्तेचा मद चढलेले तीन चित्रपट. त्यांना प्रेक्षकांचा भरपूर प्रतिसाद मिळाला आणि पसंतीची पावतीही मिळाली.

– आदिनाथ हरवंदे
adharwande@gmail.com



**सूर्य होता रात्रीला!**

**मेधा आलकरी**

**मूल्य ४०० रुपये**
**सवलतीत २४० रुपये**

लेखिकेचा गेल्या पंधरा वर्षांत वीस देशांमध्ये वास्तव्यासाठी वा पर्यटनाच्या निमित्ताने जो प्रवास झाला त्याचं हे अनुभवलेखन. यामधून त्या त्या देशातील लोकजीवन, पर्यटनस्थळं, वन्यजीवन वाचायला मिळतं. सहप्रवासाची जाणीव आणि तरीही एकटे होण्यातला सुटेपणा ह्यांची इथे होणारी सरमिसळ सहजसुंदर आहे. मध्यपूर्व आशिया, आशिया, आफ्रिका, युरोप आणि ऑस्ट्रेलिया अशा पाच खंडांतील वैविध्यपूर्व चर्वीचं हे पंचखाद्य!



**हरित वसईचा लढा**

**मार्कुस डाबरे**

**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत ९० रुपये**

वसई हा मुंबईलगतचा निसर्गरम्य प्रदेश. तीस वर्षांपूर्वी तो धनदांडगे, बिल्डर आणि सरकारी धोरणांच्या वक्रदृष्टीत सापडला. पैसा आणि दहशतीच्या जोरावर इथली हिरवी शेतं बांधकामाच्या वाळवीनं गिळंकृत व्हायला लागली. या परिसराचं नैसर्गिक अस्तित्व टिकवण्यासाठी उभी राहिली 'हरित वसई संरक्षण समिती'. त्यांनी उभारलेल्या लढ्यात फादर दिब्रिटोंसारख्या धर्मगुरूंपासून अनेकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विजय तेंडुलकर, माधव गडकरी अशा दिग्गजांचा पाठिंबा त्यास मिळाला. या संघर्षातील एक अग्रणी मार्कुस डाबरे यांनी मांडलेली ही संघर्षकहाणी.

# ‘भ्रामक समृद्धी हा समाजाला लागलेला गंभीर रोग’

**– कुमार केतकर**

सोयीस्कर रीत्या डेव्हलपमेण्ट रुल बदलणे, एफएसआय वाढवून देणे आणि जमिनी ‘एनए’म्हणजे नॉन-ॲग्रिकल्चरल करणे, या आता अमाप पैसे मिळवण्याच्या शासनमान्य पद्धती झाल्या आहेत. राजकारणी मंडळी, नोकरशहा, पोलीस अधिकारी व बिल्डर-कॉन्ट्रॅक्टर्स यांच्या टोळ्यांनी वसई, ठाणे, मुंबई, पुणे, नाशिक येथील जमिनी बाजारात आणून गडगंज पांढरा आणि अफाट काळा पैसा जमा केला आहे. आपली नवी अर्थव्यवस्था या टोळ्याच चालवतात. यातून निर्माण झालेली समृद्धी म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेवर चढलेली अनावश्यक चरबी आहे. असा इशारा ‘लोकसत्ता’चे संपादक कुमार केतकर यांनी दिला.

देवतलाव येथील फादर बर्नाड भंडारी सभागृहात ‘हरित वसईचा लढा’ या मार्कुस डाबरे यांच्या पुस्तकाचे ६ डिसेंबर २००९ रोजी कुमार केतकर यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या वेळी फादर दिब्रिटो अध्यक्षस्थानी आणि कोकण परिक्षेत्राचे माजी पोलीस संचालक उल्हास जोशी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

विकासाच्या नावाखाली भलेमोठे टॉवर्स, मॉल्स, मल्टिप्लेक्स उभे राहिले आहेत. इंडस्ट्रीज आणि गिरण्या नष्ट होऊन त्याजागी ३०-४० हजार रुपये प्रति स्क्वे. फुटाचे फ्लॅट झाले. उत्पादन न करता विकास करायचा हे नवे तंत्रज्ञान वापरात आले. त्यातून आपल्याला भ्रामक समृद्धीद्वारे संमोहित करण्यात आले आहे. दोन-दोन तास ट्रेनचा जीवघेणा प्रवास करत आपण एसी ऑफिसमध्ये काम करताना धन्यता मानतो. त्यानंतर घरी आल्यावर प्लाझ्मा टीव्हीवर कार्यक्रम बघत बसतो. ४०-५० हजारांचा भरघोस पगार मिळतो. पैसा वाढला म्हणजे विकास झाला, अशी नवीन व्याख्या तयार झाली. पैसा वाढला, पण जीवनमान घसरले. मूठभर लोकांना विकासाची फळे मिळाली याला विकास म्हणायचा काय? असे केतकर यांनी आपल्या भाषणातून उपस्थित श्रोत्यांना मार्गदर्शन केले.

‘हरित वसईचा लढा’ आणि वसई-विरार महापालिकेबाबत फादर दिब्रिटो यांनी आपले परखड विचार मांडले. ओम शांती-शांती बोलत असताना क्रांती-क्रांती असे वसईच्या लढ्यात मला बोलावे लागले. या लढ्यात अनेकांना शारीरिक-मानसिक यातना झाल्या. ओरबाडण्याच्या वृत्तीला विकासाच्या नावाने खतपाणी घातले गेले. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास झाला. २० वर्षांत जे पेरले ते या वेळी थोडेसे वेचायला मिळाले. विवेक पंडित यांच्या रूपाने परिवर्तन झाले, असे दिब्रिटो म्हणाले.

वसईचा लढा अजूनही संपलेला नाही. आपापसात राजकारण फार झाले. ते सोडून एकत्र येण्याची गरज आहे. संघर्षाचे फलित अजून झालेले नाही, असे उल्हास जोशी यांनी या वेळी नमूद करताना संस्कृती नष्ट होण्याची भीती व्यक्त केली. या सोहळ्याचे प्रास्ताविक मार्कुस डाबरे यांनी केले. सूत्रसंचालन उज्ज्वला लेमॉस यांनी केले आणि आभार जॉन परेरा यांनी मानले.


ग्रंथाली



**फुलाला सुगंध मातीचा**

**डॉ. अनुराधा हरकरे**
**डॉ. अंजली कुलकर्णी**

मूल्य १५० रुपये
सवलतीत ९० रुपये